हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ (मर्या.)

१ सप्टेंबर, २०१८ अंक ११वा
वर्धापनदिन विशेषांक

शतकाची परंपरा
Haffkine
मानव सेवेत समर्पित

# हाफकिन वृत्त

मानव सेवेत समर्पित





विशेष घडामोडी




राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह



कामगारांचा सत्कार



कामगार प्रशिक्षण वर्ग




हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाच्यावतीने मंत्रीमहोदय मा.ना.श्री. गिरीशजी बापट साहेब यांच्या हस्ते लाभांश निधीचा एक कोटी चार लाख सत्तेचाळीस हजार नऊशे वीस रुपयांचा धनादेश माननीय मुख्यमंत्री मा.ना.श्री. देवेंद्र फडणवीस यांना दिनांक २४ ऑगस्ट २०१८ रोजी सुपूर्द करण्यात आला.

# विशेष आभार



**मा.ना.श्री. देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



**मा.ना.श्री. गिरीश बापट**
मंत्री, अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण,
अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य, महाराष्ट्र राज्य



**मा.ना.श्री. मदन येरावार**
राज्यमंत्री, उर्जा, पर्यटन, अन्न व औषध प्रशासन,
सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम)
आणि सामान्य प्रशासन, महाराष्ट्र राज्य



**मा. श्री. संजय देशमुख** (भा.प्र.से.)
सचिव
वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग



**मा. श्रीमती संपदा मेहता** (भा.प्र.से.)
व्यवस्थापकीय संचालक
हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ (मर्या.)

**टिकाकारांचा नेहमी आदरच करा, कारण तुमच्या गैरहजेरीत ते तुमचं नाव चर्चेत ठेवतात.**

# व्यवस्थापकीय संचालक यांचे मनोगत



१ सप्टेंबर २०१८ रोजी हाफकिन महामंडळ ४४ व्या वर्षामध्ये पदार्पण करीत आहे. या वर्धापन दिनाच्या महामंडळातील सर्व अधिकारी, कर्मचारी, माजी कर्मचारी, महाराष्ट्र शासनातील कर्मचारी तसेच महामंडळाचे हितचिंतक यांना माझ्याकडून हार्दिक शुभेच्छा!

हाफकिन महामंडळाने आर्थिक वर्ष २०१७-२०१८ मध्ये १९५ कोटी रुपयांची उलाढाल नोंदविली आहे. हाफकिन महामंडळ उत्पादित करीत असलेली सर्व औषधे हाफकिन खरेदी कक्षामार्फत महाराष्ट्र शासनाला पुरवठा केली जात असल्यामुळे जास्तीत जास्त औषधांचे दर्जात्मक उत्पादन करून ती कमीत कमी किंमतीत शासनाला देण्याची जबाबदारी महामंडळापुढे आहे. महामंडळासाठी आनंददायी गोष्ट म्हणजे शासनाकडून हाफकिन महामंडळाला नवीन लसींची निर्मिती करण्यासाठी आर्थिक पाठबळ मिळणार आहे. शासनाकडून महामंडळाला आर्थिक मदत मिळणार असल्यामुळे जीवरक्षक औषधांचे नवीन प्रकल्प विहित वेळेत पुर्ण करणे व औषधांची उत्पादन निर्मिती करून त्याचा पुरवठा शासनाला लवकरात लवकर करून देण्याची मोठी जबाबदारी महामंडळावर असणार आहे.

**४४ व्या वर्षात पदार्पण करताना खालील ४ बाबींचे कटाक्षाने पालन करणे महामंडळासाठी अत्यावश्यक आहे.**

१. **महाबचत उपक्रम राबविणे** - महामंडळामध्ये गरज नसताना विजेची उपकरणे बंद ठेवून विजेची बचत करणे. पाण्याचा अपव्यय टाळणे, प्रशासकीय खर्च शक्य होईल तेवढा कमी करणे, स्टेशनरीची बचत करणे, उपहारगृहामध्ये देखील जेवताना अन्नाची नासाडी होणार नाही याची काळजी घेणे. शक्यतो सर्व कामे कार्यालयीन वेळेतच पुर्ण करणे, ओव्हरटाईम अत्यंत निकडीची गरज असेल तेव्हाच लागू करणे.

२. **उत्पादन विभाग सलग चालू ठेवणे** - मौखिक द्रव्य विभाग व फार्मायुनिट परळ, जळगाव येथील उत्पादन विभाग अखंडीत चालू ठेवणे व अधिकाधिक उत्पादन कमीतकमी खर्चात करून ''दर्जेदार औषधे माफक किंमतीत'' देण्याचे आपले ध्येय साध्य करणे.

३. **प्रलंबीत प्रकल्प जलद गतीने पुर्णत्वास नेणे** - हाफकिन महामंडळाच्या औषधांची श्रृंखला वाढविण्याकरिता फार्मा विभागासारखे प्रलंबित प्रकल्प जलद गतीने पुर्ण करणे आवश्यक आहे.

४. **टीम वर्क** - **Together Everyone Achieve More** - महामंडळातील सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी एकजुटीने आणि परस्पर सहकार्याने काम करणे आवश्यक आहे. चांगले टीम वर्कच आपले ध्येय गाठण्याकरिता मदत करते.

४४ व्या वर्षात पदार्पण करताना महामंडळासमोरील ध्येय गाठण्याकरिता वरील ४ बाबींचे अनुकरण करावे असा संदेश मी हाफकिन वृत्त मुखपत्राच्या माध्यमातून महामंडळातील सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांना देते.

हाफकिन महामंडळाच्या वर्धापन दिनाच्या शुभेच्छांसह !!

**श्रीमती संपदा मेहता (भा.प्र.से)**
व्यवस्थापकीय संचालक
हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ मर्या.

# संपादकीय

**जळथेंबानी कशी चमकते । सृष्टी ही साजरी ।। कधी लाज-या । आल्या श्रावण सरी - शांता शेळके**

उत्सवांची झुंबड घेऊन येणा-या श्रावण महिन्यातील अनेक सणांपैकी आपल्या सर्वांचाच एक आवडीचा सण असतो तो म्हणजे हाफकिन दिन. १ सप्टेंबर १९७५ पासून १ सप्टेंबर २०१८ ला महामंडळ ४४ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. या हाफकिन दिन सणाच्या महामंडळातील सर्व अधिकारी व कर्मचारी आणि हाफकिन वृत्त वाचकांना हार्दिक शुभेच्छा!!

या हाफकिन मुखपत्रामार्फत वाचकांना आम्ही हाफकिन महामंडळामध्ये मागील वर्षभरामध्ये घडलेल्या अनेक घडामोडींचा मागोवा सांगत असतो. या मुखपत्राला वाचकांकडून मिळालेल्या चांगल्या प्रतिसादामुळे आम्ही आनंदीत आहोत. या विशेष ११ व्या अंकामध्ये महामंडळातील कामगारांनी केलेल्या उल्लेखनिय कार्याबद्दल त्यांना मिळालेला शासनाकडून पुरस्कार, कामगार प्रशिक्षण वर्ग, सुरक्षा अभियान, शासनाकडून हाफकिनला मिळणारे आर्थिक पाठबळ इत्यादी अनेक गोष्टी आपल्याला हा अंक चाळताना वाचायला मिळतील. अंक सर्वांग सुंदर करण्याचा आम्ही प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे हा अंक वाचकांना नक्कीच आवडेल, स्फूर्ती देईल ही आशा आहे. आपल्या प्रतिक्रिया, व सूचना स्वागतार्ह.

**‘सबसे बडा रोग, क्या कहेंगे लोग.’** या मानसिक रोगाला आज अनेक जण बळी पडले आहेत. कसे काय? पंचतंत्रातील एक सुंदर गोष्ट आज मी येथे नमूद करतो. बेडकांच्या प्रजातीचा सरदार कोण ठरवावा याकरिता जंगलामध्ये सर्व बेडकांमध्ये स्पर्धा लागली. स्पर्धा अशी होती की, जंगलातील एका उंच टेकडीवर जो बेडूक लवकरात लवकर पोहोचेल त्या बेडकाला जंगलातील बेडकांचा सरदार म्हणून घोषित करण्यात येईल. जंगलातील सर्व बेडकांनी या स्पर्धेमध्ये भाग घेतला. ही स्पर्धा पहायला जंगलातील इतर सर्व प्राणी, पशु-पक्षी उपस्थित होते. जंगलाचा राजा सिंहाने मोठी गर्जना केली आणि स्पर्धेला सुरवात झाली. सर्व बेडके भरा- भरा टेकडी चढू लागली. चढता- चढता खाली पडू लागली. बेडकांना खाली पडताना पाहून जंगलातील इतर प्राणी पोट धरुन हसू लागले, त्यांची खिल्ली उडवू लागले त्यामुळे काही बेडकांनी स्पर्धेतून अर्ध्यावरच माघार घेतली. तर काही टेकडीच्या टोकावर चढण्यासाठी प्रयत्न करु लागले. शेवटी एक बेडूक मात्र टेकडीच्या टोकावर चढण्यामध्ये यशस्वी झाला. जिंकल्यानंतर सिंहाने त्या यशस्वी बेडकाची पाठ थोपटावली आणि त्याला जंगलातील समस्त बेडकांचा सरदार म्हणून घोषित केले. सिंहाने त्या बेडकाला एक प्रश्न विचारला, ‘स्पर्धा सुरु झाल्यावर जस जसे बेडूक खाली पडत होते तसे जंगलातील प्राणी तुम्हाला पाहून हसत होते. तरी देखील तू तुझे प्रयत्न चालू ठेवलेस आणि विजयी झालास या यशाचे गमक काय?’ या प्रश्नाला बेडकाने उत्तर दिले, “ ऍ. ” सिंहाला उत्तर समजले नाही त्याने परत तोच प्रश्न बेडकाला समजवून सांगितला त्यानंतर परत बेडकाचे उत्तर आले “ ऍ. ” सिंहाला उत्तर समजेना त्याने पुन्हा एकदा प्रश्न समजवण्याचा प्रयत्न केला त्यानंतर देखील बेडकाचे उत्तर होते “ ऍ. ” या वेळी तेथील उपस्थित बेडकाची आई पुढे आली आणि तिने सिंहाला सांगितले की, “ माझा बेडूक हा मुकबधीर आहे. आणि हेच त्याच्या यशाचे गमक आहे. स्पर्धेपूर्वी मी माझ्या मुलाला सांगितले होते की, जंगलातील सर्व प्राणी तुला प्रोत्साहन करायला जमले आहेत त्यामुळे तु नक्की जिंकशील. ज्यावेळी जंगलातील प्राणी बेडकांची खिल्ली उडवीत होते त्यावेळी माझ्या बेडकाला वाटले की ते मला प्रोत्साहन करीत आहेत म्हणून तो जिंकला. परंतु इतर बेडूक हे निराश झाले आणि तेच त्यांच्या पराभवाचे कारण ठरले.” ही गोष्ट सांगायचे कारण की, मी परीक्षेत नापास झालो तर लोक काय म्हणतील?, माझ्या मुलाला चांगल्या शाळेत ॲडमिशन नाही मिळाले तर लोक काय म्हणतील?, हॉटेलमध्ये जेवताना माझा मुलगा तोंडाचा फार आवाज करतो ते ऐकून लोक काय म्हणतील? असे अनेक प्रश्न आहेत त्या प्रश्नाला आपण घाबरतो कारण लोक काय म्हणतील? याच मुखपत्रातील पान क्र. २४ वाचकांनी अवश्य वाचावा अशी मी विनंती करतो. या रोगावरील इलाज संत तुकारामांनी अतिशय छान ओवींद्वारे सांगितला आहे. - “आपणची तारी । आपणची मारी। आपणची उध्दारी। आपणया ।।”

लोकांचे काय घेवून बसलात? काही केलंत तरी त्याला नाव ठेवण्याची त्यांना सवयच आहे. आपल्या आयुष्याचे चांगले वाईट करणारे आपणच कर्ता करविता आहोत. मंगेश पाडगावकरांनी फार सुरेख शब्दांत ही भावना व्यक्त केली आहे.

“ फिदीफिदी हसतील ते हसु देत की.... बोटं मोडीत बसतील ते बसू देत की.....
आपण का शरमून जायचं.....? कशासाठी वरमून जायचं?
कशासाठी भयाने ग्रासून जायचं....?
फुलायच्या प्रत्येक क्षणी कशाला नासून जायचं...?
आपलं जीवन आपण ठरवायचं, कसं जगायचं.....
कण्हत कण्हत कि, गाणं म्हणत, हे आपणच ठरवायचं! ”

हाफकिन दिन सणाच्या शुभेच्छांसह!!

**श्री. अमित आ. डोंगरे**
प्रबंध संपादक - हाफकिन वृत्त.

दि. ०१.०९.२०१८, महामंडळाच्या स्थापनेला ४३ वर्षाचा कालावधी उलटला. निश्चितच सिंहालोकन करावे इतपत काळ लोटला आहे व आतापर्यंतच्या वाटचालीतील टप्पे समजून घ्यावे म्हणून याची आवश्यकता भासते. माणुस दोन नजरेने चितारता येतो असे म्हणतात, एक, स्वतःच्या नजरेने व इतरांच्या नजरेने. परंतु एखाद्या संस्थेच्या बाबतीत हे शक्य होईलच असे नाही. महामंडळाच्या नावाभोवतालचे तेजोवलय अलौकिक आहे व त्याचा शोध घ्यावयाचा म्हणजे शतकांच्या पाउलखुणांचा शोध घ्यावा लागेल. महामंडळात आज नवनिर्माण होत आहे व त्यासाठी श्रम अपरिहार्य. जेणेकरुन उद्योजकता जोपासता येवू शकेल.

दुस-याच दिवशी दि. ०२.०९.२०१८ रोजी जन्माष्टमी आहे. द्वापारयुगातील “संभवामी युगे युगे” म्हणत श्रीकृष्णाचा अवतार झाला. चराचर व्यापुन टाकणारा “श्री” म्हणजे नितांत सुंदर. मनुष्यत्व व देवत्वाचा मिलाफ तत्व, निती, युक्ती, प्रसंगी शरणागती या गतींचा उद्‌गाता. भगवत्‌गीतेतील कर्मयोग व त्याचबरोबर महाभारत याचे समस्त भारतवर्षावर गारुड आहे. कर्म, निष्काम समर्पण, काळाची पावले ओळखत त्यांचा वेध घेणे त्याचबरोबर अवकाशाशी नाते जोडताना हा ‘अवकाश’ प्रत्येक सरत्या वर्षाबरोबर कसा विकास पावतो हे न्याहळतानाचा घुमार वेगळाच असतो. करण्यासारखे खुप आहे, आपण सुरुवात करावयास पाहिजे. कारण त्यामुळेच शिघ्रगतीने होणारे बदल, बदलत्या भुमिका अंगीकारणे सहज शक्य होईल. परस्परांवरील विश्वास नवीन उमेद वाढीस लावणारा असेल यात शंका नाही.

वर्धापन दिनाच्या शुभेच्छा.

लेखनसिमा
**श्री. जगदीश कुलकर्णी**

**संपादकीय मंडळ :**

**श्री. अमित आ. डोंगरे**
कामगार कल्याण अधिकारी, जनसंपर्क अधिकारी
प्रबंध संपादक - हाफकिन वृत्त.

**श्री. जगदीश कुलकर्णी**
प्र. व्यवस्थापक प्रशासन
कार्यकारी संपादक

**श्री. किरण जाधव**
कार्यकारी संपादक
तथा वितरक

**श्री. दिनेश जगताप**
वितरक

प्रत्येक वस्तूची किंमत वेळ आल्यावरच होत असते, कारण वातावरणात फुकट मिळणारा ऑक्सिजन दवाखान्यात खुप महाग विकला जातो.

# मुखपृष्ठ माहिती

औषध निर्मिती आणि संशोधन कामात गती यावी व संशोधनाला योग्य प्रकारे चालना मिळावी यासाठी नेमण्यात आलेल्या डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केलेल्या शिफारशींचे सादरीकरण दिनांक २५ ऑगस्ट २०१८ रोजी सहयाद्री अतिथीगृह येथे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांना करण्यात आले. कमीत कमी किंमतीत दर्जेदार औषधे उपलब्ध करून देण्याचे उद्दीष्ट यामध्ये ठेवण्यात आले आहे.

हाफकिनमध्ये सर्पदंशावरील लस तसेच साथीच्या आजारांवरील लसींच्या संशोधनासाठी अद्ययावत प्रयोगशाळा व इतर सुविधांची गरज असल्याचे डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी यावेळी सांगितले.

हाफकिन महामंडळाच्या माध्यमातून दर्जेदार लसी व औषधे तयार व्हावीत त्याचबरोबर संशोधन कार्यही व्हावे यासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देवून महामंडळाला विशेष दर्जा मिळावा यासाठी केंद्र सरकारकडून सहकार्य मिळविण्यात येईल असे आश्वासन आणि महामंडळाला कर्मचाऱ्यांची कमतरता भासू नये याबाबत खासगी तज्ज्ञ सल्लागारांच्या मदतीने कंत्राटी पध्दतीने सेवा घेण्याचे आदेश माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

महाराष्ट्र शासनाची औषध निर्मिती क्षेत्रातील एकमेव कंपनी असलेल्या हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाला विविध जीवरक्षक लसी आणि औषधांची निर्मिती करण्यासाठी राज्य शासनातर्फे १०० कोटी रुपयांचा निधी देण्यास माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी तत्वतः मंजुरी दिली.

याप्रसंगी हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाच्या वतीने २०१५-१६ या आर्थिक वर्षाचा एक कोटी चार लाख सत्तेचाळीस हजार नऊशे वीस रुपयांच्या लाभांशाचा धनादेश माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांना मंत्रीमहोदय श्री. गिरीश बापट यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला. यावेळी हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक श्रीमती संपदा मेहता (भा.प्र.से.), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे सचिव श्री. संजय देशमुख (भा.प्र.से.), हाफकिन सल्लागार समितीचे अध्यक्ष डॉ. रघुनाथ माशेलकर, सदस्य डॉ. आनंद बंग, महाव्यवस्थापक श्री. सुभाष शंकरवार आदि मान्यवर उपस्थित होते.







## मंत्रीमहोदय मा.ना. श्री. गिरीश बापट यांची हाफकिन अजिंठा फार्मा. लि. जळगाव विभागाला भेट.









हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाची उपकंपनी असलेली हाफकिन अजिंठा फार्मा लिमिटेड जळगाव ही मागील २ वर्षांपासून काही तांत्रिक कारणास्तव बंद होती. या कंपनीचे पुररुज्जीवन करण्यासाठी व परत नव्याने कंपनी सुरू होवून राज्यभरातील गोर-गरिब जनतेला अत्यंत माफक दरामध्ये दर्जेदार औषधांचा पुरवठा व्हावा याकरिता मा. ना. श्री. गिरीश बापटसाहेब, मंत्री, अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य महोदयांनी दिनांक १४.०६.२०१८ रोजी हाफकिन अजिंठा फार्मा लिमिटेड कंपनीला जळगाव येथे जाऊन प्रत्यक्ष भेट दिली.

हाफकिन अजिंठा फार्मा लिमिटेड जळगाव येथे ओ.आर.एस. ॲण्टीबायोटिक्स् कॅप्सूल, ॲण्टीपायरेटीक्स् टॅब्लेटस्, दमा रोगावरील टॅब्लेटस्, टाईफाईड टॅब्लेटस्, मानसिक रोगावरील टॅब्लेटस्, अतिसार टॅब्लेटस्, पोटदुखीवरील टॅब्लेटस्, ॲलजी इत्यादी सारख्या ४१ रोगांवरील औषधे तयार केली जातात.

राज्यशासनाकडून दरवर्षी ७१ प्रकारच्या औषधांची खरेदी केली जाते. त्यापैकी ४१ प्रकारची औषधे हाफकिन अजिंठा मार्फत पुरवठा केली जातात. हाफकिन अजिंठा अद्ययावत झाल्यावर राज्यशासनास लागणा-या ७१ प्रकारच्या औषधांची निर्मिती हाफकिन अजिंठा फार्मा लिमिटेड कंपनीकडून करण्यात येईल.

विशेष म्हणजे हाफकिन अजिंठा फार्मा लिमिटेड कंपनी शासनाचीच कंपनी असल्यामुळे आणि शासनच औषधांची खरेदी करणार असल्यामुळे आता निविदा काढण्यात येणार नाही व शासनच हाफकिन अजिंठा फार्मा लिमिटेड कंपनीने उत्पादित केलेली सर्व औषधे खरेदी करणार आहे असे मा. ना. श्री. गिरीश बापटसाहेब, मंत्रीमहोदयांनी आश्वासन दिले. व त्याप्रमाणे हाफकिन अजिंठा फार्मा लिमिटेड कंपनीने उत्पादित केलेली औषधे आता थेट हाफकिन खरेदी कक्षामार्फत महाराष्ट्र शासनाला पुरवठा केली जात आहेत. याविषयी माननीय मंत्रीमहोदयांचे शतशः आभार.

राज्यशासनाकडून १५ लाखांची ॲमॉक्सीसिलीन या ॲण्टीबायोटीक्स् कॅप्सूलची मागणी हाफकिन अजिंठा फार्मा लिमिटेड कंपनीला मिळालेली आहे. व या मागणीचा पुरवठा करण्याकरिता उत्पादन कार्य जोरात सुरु आहे. ऑगस्ट २०१८ पर्यंत ॲमोक्सीसीलीन ॲण्टी बायोटीक्स कॅप्सूलचे १०,४३,८०० कॅप्सूलचे उत्पादन होवून थेट हाफकिन खरेदी कक्षामार्फत महाराष्ट्र शासनाला पुरवठा करण्यात आलेला आहे.

हाफकिन अजिंठा फार्मा लिमिटेड प्रकल्पाची दुरूस्ती व यंत्रसामुग्री अद्ययावत करण्याकरिता किमान ७ कोटी रूपये एवढया निधीची आवश्यकता आहे. केंद्र व राज्य शासनाकडून हा निधी उपलब्ध

# मान्यवरांच्या भेटी




ॲमॉक्सीसिलीन ॲण्टीबायोटीक्स् कॅप्सूल

करण्यात येणार आहे. तसेच मुख्यमंत्री निधी, पालकमंत्री, आमदार, खासदार, जिल्हाधिकारी, धर्मादाय उपायुक्त, यांच्याकडून देखील निधीची मागणी करण्यात येत आहे. या भेटीमध्ये माननीय मंत्री महोदय श्री. गिरीशजी बापट यांनी जळगावच्या संपूर्ण प्रकल्पाची पाहणी केली तसेच अधिका-यांची बैठक घेवून चर्चा केली. या बैठकीमध्ये महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक श्रीमती संपदा मेहता, महाव्यवस्थापक तथा संचालक श्री. सुभाष शंकरवार, महाव्यवस्थापक हाफकिन अजिंठा फार्मा लिमिटेड कंपनी श्री. घनश्याम सुपे, व्यवस्थापक गुणवत्ता अश्वासन डॉ. सुमंत कर्णिक, व्यवस्थापक गुणनियंत्रण डॉ. नागलकर, व्यवस्थापक पणन श्री. शोमू पॉल, व्यवस्थापक प्रशासन श्री. जे. व्ही. कुलकर्णी, उत्पादन प्रमुख श्री एस. के. रोकडे, उत्पादन अधिकारी श्री. तुषार चौधरी व हाफकिन अजिंठा फार्मा लिमिटेड कंपनीचे कामगार संघटनेचे अध्यक्ष एस. बी. चौधरी, उपाध्यक्ष श्री. ए. एस. चौधरी तसेच सल्लागार श्री. एस. आर. विसपुते उपस्थित होते.

माननीय मंत्री महोदय श्री बापट साहेब यांनी स्वतः लक्ष घालून हाफफिकन अजिंठा फार्मा कंपनीचे प्रश्न, समस्या सोडविल्याबद्दल मंत्री महोदयांचे शतशः आभार यामुळे हाफकिन अजिंठा फार्मा लिमिटेड कंपनी जळगाव मध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.





हाफकिन संस्था आणि हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ या शासनाच्या दोन संस्थांच्या मुल्यमापनासाठी तज्ज्ञांची उच्चाधिकार समिती शासनाने नेमली आहे. या समितीच्या अध्यक्षपदी जेष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांची नियुक्ती शासनाने केली आहे. तद्अनुषंगाने दिनांक १५.०२.२०१८ रोजी मा. ना. श्री. गिरीश बापट, मंत्री अन्न व औषध पशासन, अन्न व नागरी पुरवठा, संसदीय कार्य, डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ. निर्मल गांगुली, प्राध्यापक डॉ. देवांग खाखर यांनी प्रतिविष व रक्तजल पिंपरी विभागाला भेट दिली. याप्रसंगी हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाच्या तत्कालीन व्यवस्थापकीय संचालिका श्रीमती. सीमा व्यास (भा.प्र.से.) आणि श्री. सुभाष शंकरवार महाव्यवस्थापक, डॉ. शिवाजी गाडे व्यवस्थापक प्रतिविष व रक्तजल पिंपरी विभाग यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

# विशेष घडामोडी

हाफकिन महामंडळाच्या प्रतिविष व रक्तजल पिंपरी मार्फत वर्ष २०१७-२०१८ मध्ये ३,०३,२५१ सर्पदंश प्रतिविष औषधांच्या कुप्यांचे उत्पादन करण्यात आलेले आहे. तसेच विंचूदंश प्रतिविष औषधांच्या १६,४४३ कुप्यांचे उत्पादन करण्यात आलेले आहे. प्रतिधनर्वात लसींचे १३,०६४ कुप्यांचे उत्पादन करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र शासनाकडून नव्याने १,०६,००० सर्पदंश प्रतिविष औषधांच्या कुप्यांची मागणी हाफकिन महामंडळाला आलेली आहे.



हाफकिन महामंडळाच्या परळ येथील मौखिक द्रव्य विभाग एप्रिल २०१८ पासून पुन्हा नव्या जोमाने सुरु झाला आहे. महाराष्ट्र शासनाने तापावरील सिरपच्या ५ कोटी औषधांची मागणी हाफकिन महामंडळाकडे केलेली आहे. एप्रिल २०१८ पासून ऑगस्ट २०१८ पर्यत मौखिक द्रव्य विभागाने २०,९०,५७० पॅराकिन सिरप या तापावरील औषधांच्या बाटल्या उत्पादित करून हाफकिनच्या खरेदी कक्षामार्फत महाराष्ट्र शासनाला पुरवठा केलेला आहे. महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांतील शासकीय इस्पितळे, दवाखाने येथे पॅराकिन सिरपचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

# हाफकिन महामंडळामध्ये वनसप्ताहानिमित्त आयोजित वृक्ष लागवडीचा कार्यक्रम





महाराष्ट्र शासनाचे वर्ष २०१८ करिता संपूर्ण महाराष्ट्रामध्ये १३ कोटी वृक्षांची लागवड करण्याचे लक्ष्य आहे. यावर्षी हाफकिन महामंडळाच्या परळ, पिंपरी आणि जळगाव या विभागांमध्ये मोठ्या उत्साहात वृक्ष लागवड कार्यक्रम करण्यात आला.

**वृक्षांची लागवड विषयी माहिती:-**

| अ.क्र. | वृक्षारोपण माहिती | मुंबई विभाग | पिंपरी विभाग | जळगाव विभाग |
|---|---|---|---|---|
| १ | वर्ष २०१८ मध्ये केलेल्या वृक्षारोपणांची संख्या | ८ | १६५ | ७५ |
| २ | मागील ४ वर्षांमध्ये वृक्षारोपण केलेल्या एकूण वृक्षांची संख्या | १४० | १२६५ | १०० |

पिंपरी चिंचवड महानगरपालिका वृक्ष प्राधिकरण यांनी आयोजित केलेल्या 'वृक्ष लागवड आणि संवर्धन' स्पर्धेमध्ये हाफकिन महामंडळाच्या प्रतिविष व रक्तजल पिंपरी विभागाला २०१८ वर्षाकरिता प्रथम क्रमांक मिळाला आहे. यापूर्वी २०१५ वर्षा करिता देखील हाफकिन महामंडळाच्या प्रतिविष व रक्तजल पिंपरी विभागाला प्रथम क्रमांक मिळाला होता. पिंपरी विभागातील सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांचे हार्दिक अभिनंदन !!!

वर्तमानात रोपे रुजवूया कोटी कोटी
भविष्यात संगोपनाची ठेवू सचोटी

लावुया ३ वर्षात ५० कोटी वृक्ष
करुया हरित संपन्न महाराष्ट्र
२०१८ चे एकच लक्ष्य १३ कोटी वृक्ष





'बदला' लेने की नहीं, बदलाव लाने की, सोच रखिये । समझदार व्यक्ति, वह नहीं, 'जो ईट का जवाब पत्थर' से दे ।
समझदार व्यक्ति वो है, जो फेंकी हुई ईट से अपना 'आशियाना' बना ले ।

# आनंद सोहळा

## वर्धापन दिन





### परळ, मुंबई विभाग







हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाचा ४३ वा वर्धापन दिन १ सप्टेंबर २०१७ रोजी हाफकिन संस्थेच्या ऐतिहासिक दरबार हॉल येथे साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक माननीय श्रीमती सीमा व्यास या होत्या. या कार्यक्रमाकरिता मुख्य अतिथी म्हणून प्रसिध्द सिनेअभिनेत्री श्रीमती मधुरा वेलणकर यांना निमंत्रित करण्यात आले होते. याप्रसंगी हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाच्या तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक श्रीमती सीमा व्यास (भा.प्र.से.), श्री. सुभाष शंकरवार महाव्यवस्थापक (उत्पा.) श्री. प्रदिप आचरेकर सरचिटणीस मान्यताप्राप्त कामगार संघटना, श्रीमती सोनल सावंत अध्यक्ष हाफकिन ऑफिसर्स असोसिएशन यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून आणि डॉ हाफकिन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

कार्यक्रमाची सुरुवात श्रीमती श्रेयसी मुळे, श्रीमती उषा मकवाना आणि श्रीमती रश्मी शिंपी यांच्या गणेशस्तवनाने झाली. श्री पांडुरंग गुरव यांच्या तुतारी वादनाने वातावरण अल्हाददायक झाले. श्री. जगदिश कुलकर्णी व्यवस्थापक (प्रशासन) यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या मुख्य अतिथी श्रीमती मधुरा वेलनकर यांनी त्यांच्या भाषणामध्ये 'हाफकिन महामंडळाच्या जवळच त्या राहतात त्यामुळे हाफकिनला भेट देण्याची त्यांना फार इच्छा होती व ती इच्छा या कार्यक्रमाच्या निमित्ताने पूर्ण झाली याचा त्यांना आनंद वाटला व हाफकिन महामंडळास पुढील वाटचालीस त्यांनी शुभेच्छा दिल्या'.

प्रतिवर्षाप्रमाणे या दिवशी 'हाफकिन वृत्त' या हाफकिन महामंडळाच्या वार्षिक अंकाच्या १० व्या आवृत्तीचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

द्वितीय सत्रामध्ये हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळातील कर्मचा-यांकरिता संगीत वाद्यवृंदाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमामध्ये महामंडळातील अधिकारी आणि कर्मचारी यांनी गायन, नृत्य सादर केले.













































तुम्ही ठरवलेल्या ध्येयांवर जर लोक हसत नसतील तर तुमची ध्येये खुपच लहान आहेत हे लक्षात घ्या.




# आनंद सोहळा

## प्रतिविष व रक्तजल पिंपरी विभाग





हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाच्या प्रतिविष व रक्तजल विभाग येथे दि. १ सप्टेंबर २०१७ रोजी हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाचा ४३ वा वर्धापन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाकरिता मुख्य अतिथी म्हणून श्री. रंगनाथ नाईकडे (भा.व.से.), उप वनसंरक्षक वनविभाग, पुणे यांना निमंत्रित करण्यात आले होते. भारतीय कामगार सेना, मान्यताप्राप्त कामगार संघटना, पिंपरी यांचे चिटनिस श्री जयसिंग पोवार, युनिट अध्यक्ष श्री. प्रविण वाघमारे आदि मान्यवर उपस्थित होते. डॉ. शिवाजी गाडे, व्यवस्थापक, प्रतिविष व रक्तजल विभाग यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भुषविले. श्री महेश लाहिगुडे, कक्ष अधिकारी यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. मुख्य अतिथी श्री रंगनाथ नाईकडे यांनी त्यांच्या भाषणामध्ये मानवसेवेत करित असलेल्या कार्याबद्दल महामंडळाचे अभिनंदन केले. व महामंडळाला पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी मान्यवर अतिथींच्या हस्ते महामंडळामध्ये वृक्षारोपन करण्यात आले. स्नेहभोजनानंतर द्वितीय सत्रामध्ये संगीतवाद्यवृंदाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.













## चित्रबोध



शेजारील चित्र पाहून आपणास काय चित्रबोध होतो याबाबत किमान १० ओळींमध्ये लेखी माहिती मराठी भाषेमध्ये हाफकिन वृत्त समितीला पाठवा. अतिउत्कृष्ठ असलेली माहिती आम्ही पुढील अंकामध्ये प्रसिध्द करु तसेच अतिउत्कृष्ठ माहिती पाठविलेल्या अधिकारी/कर्मचारी यांस हाफकिन वृत्त समितीकडून एक विशेष बक्षीस देण्यात येईल.

हाफकिन वृत्त या मुखपत्राच्या १०व्या अंकामध्ये चित्रबोध या सदराअंतर्गत दिलेल्या चित्राचा अर्थ प्रतिविष व रक्तजल विभाग, पिंपरी येथील अभियांत्रिकी विभागात कार्यरत असलेले कर्मचारी श्री. दिनेश अविनाश पवार, यांनी अतिशय चांगल्या प्रकारे अर्थ समजावून त्याची माहिती विहित वेळेत हाफकिन वृत्त समितीला पाठविली आहे. मागील चित्रबोध सदराचे विजेते म्हणून श्री दिनेश अविनाश पवार यांना हाफकिन वृत्त समितीकडून विशेष बक्षिस देण्यात आले. **श्री. दिनेश अविनाश पवार** यांचे हार्दिक अभिनंदन! श्री दिनेश अविनाश पवार यांनी लिहिलेले मागील अंकातील चित्रबोध कोडयाचे उत्तर खाली प्रसिध्द करीत आहोत.



चित्रामध्ये दोन व्यक्ती दिसत आहेत. त्यापैकी भिक मागणारा व्यक्ती शारीरिक दृष्टया सदृढ दिसत आहे. व दुसरा व्यक्ती दोन्ही हातांना दिव्यांग असून देखील बोजा वाहून नेत आहे. या बोजा वाहणा-या दिव्यांग व्यक्तीने अंपगात्वावर मात करून कोणावर अवलंबून न राहणा-या व्यक्तीचे गुण त्याच्यामध्ये दिसत आहे. यावरुन मनुष्य आपल्या शारीरिक कमतेरतेवर मात करून जग जिंकू शकतो हे सिध्द होते. त्याचबरोबर दुसरा भिकारी व्यक्ती बोजा वाहणा-या व्यक्तीकडे पाहून बोध घेत आहे की, ''कष्टाविना फळ नाही'', व अंधारातून प्रकाशाची वाट असे म्हणावे लागेल. आळशीपणाने काही साध्य होत नाही हे सिध्द होते.

**तुमच्याकडून चुका होत नसतील तर तुम्ही फक्त सोप्या गोष्टींवर काम करत आहात. ही सर्वात मोठी चूक आहे.**







महिला शिक्षणाच्या आद्यप्रयुक्त्या सावित्रीबाई फुले यांच्या १० मार्च या स्मृती दिनाचे औचित्य साधून हाफकिन महामंडळामध्ये महिलादिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. महाव्यवस्थापक उत्पादन श्री. सुभाष शंकरवार, श्रीमती सोनल सावंत अध्यक्ष हाफकिन ऑफिसर्स असोसिएशन, श्रीमती गंवढळकर, श्रीमती हेमांगी विसावे, श्रीमती विदया सवाखंडे, डॉ. सुमंत कर्णिक, श्री. प्रदिप आचरेकर सरचिटणीस मान्यताप्राप्त कामगार संघटना या मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेसमोर दीपप्रज्वलन करून पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

याप्रसंगी श्रीमती श्रेयसी मुळे, श्रीमती उषा मकवाना आणि श्रीमती प्राची तारे यांनी सरस्वती वंदनाचे गायन केले.



प्रथम सत्रामध्ये महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित झालेले श्री मुकुंद सदाशिव कानडे यांनी ‘सुजान पालकत्व ’ या विषयावर व्याख्यान दिले. कॉस्मिक इनसाईटस या संस्थेचे संस्थापक डॉ. अर्जून पै यांनी ‘अध्यात्मिक विचार आणि मन शुध्दिकरण ’ या विषयावर व्याख्यान दिले. श्रीमती रेणुका जागेश्वर राठोड यांनी उपस्थित महिला कर्मचा-यांना ‘फिजीओथेरेपी’ या विषयावर माहिती दिली.

महिला दिनाच्या द्वितीय सत्रामध्ये महामंडळातील महिलांनी नृत्य, गायन यासारखे मनोरंजानात्मक व सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

या महिलादिनी हाफकिन बालवाडीतील लहान मुलांनी नृत्य सादर केले तसेच वर्षभरामध्ये बालवाडीमध्ये धावणे, संगीत, गायन, चित्रकला इत्यादी स्पर्धांमधून विजयी झालेल्या मुलांना याप्रसंगी मेडल देवून सत्कार करण्यात आला. हाफकिन बालवाडीतील लहान मुलांनी ‘आमचे आदर्श व्यक्तिमत्व’ या विषयाला अनुसरून स्वामी विवेकानंद, सावित्रीबाई फुले, संत तुकाराम, चाचा नेहरू, सायना नेहवाल, इंदिरा गांधी इत्यादी थोर व्यक्तींची वेशभुषा परिधान करून आले होते.



चांगल्या व्यक्तीसोबत मैत्री ही ऊसासारखी असते.तुम्ही त्याला तोडा, घासा, पिरगळा, ठोका किंवा ठेचून बारिक बारिक करा तरी अखेरपर्यंत त्यामधून गोडवाच बाहेर येईल.



# औद्योगिक सुरक्षा दिन

हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळामध्ये या वर्षी प्रथमच ४ मार्च २०१८ रोजी 'सुरक्षा दिन' साजरा करण्यात आला. व संपूर्ण मार्च महिना हा 'औदयोगिक सुरक्षा महिना' म्हणून साजरा करण्यात आला. भारत सरकारच्या राष्ट्रीय सुरक्षा परिषदेने यावर्षी देशभरातील आस्थापनांनी ''सुरक्षा एवं स्वास्थ्य के लक्ष्य हासिल करने के लिए कार्यस्थल पर सकारात्क बर्ताव का प्रबलन करें'' या विषयाला अनुसरून मार्च २०१८ महिन्यामध्ये राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह साजरा करावा असे आवाहन केले होते. त्यानुसार हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ आणि भारत सरकारच्या राष्ट्रीय सुरक्षा परिषद यांच्या सहयोगाने हाफकिन महामंडळामध्ये 'औदयोगिक सुरक्षा महिना' म्हणून साजरा करण्यात आला. या राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह अभियानाअंतर्गत सुरक्षा विषयी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

**स्पर्धा क्र. १ - सुरक्षा दिन सप्ताह बॅज स्पर्धा -**

सुरक्षा सप्ताह अभियानादरम्यान महामंडळातील सर्व कर्मचाऱ्यांना सुरक्षित बॅज चे वाटप करण्यात आले; सदर सुरक्षा बॅज महिनाभर गणवेश किंवा शर्टाला लावून काम करणा-या कर्मचा-यांची शेवटच्या दिवशी बॅज जमा करून लॉटरी पध्दतीने कर्मचाऱ्यांना निवडण्यात आले. या कर्मचा-यांना महामंडळाकडून डॉ. हाफकिन यांचे चित्र असलेले घडयाळ बक्षिस देवून गौरविण्यात आले.

**स्पर्धा क्र. २ - सेफ्टी स्लोगन, शेरो शायरी, कविता, चारोळी, निबंध, पोस्टर स्पर्धा --**

मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेमध्ये स्वनिर्मित सुरक्षा संबंधी म्हणी (स्लोगन), शेरो- शायरी, कविता, चारोळी, पोस्टर तयार करण्याचे महामंडळातील कर्मचा-यांना आवाहन करण्यात आले. तसेच सुरक्षा संबंधी 'एक भारतीय नागरिक, कंपनीतील कर्मचारी, कुटुंबातील सदस्य या नात्याने आपल्या काय जबाबदा-या आहेत' याविषयी निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. उत्कृष्ट स्लोगन, शेरोशायरी, कविता, चारोळी, निबंध लिहिलेल्या महामंडळातील अधिकारी आणि कर्मचारी यांना बक्षिसे देवून सत्कार करण्यात आला.

**सुरक्षा अभियाना अंतर्गत वरील स्पर्धांमध्ये विजयी झालेले महामंडळाचे अधिकारी आणि कर्मचारी**



स्वभावातील गोडीने आणि जीभेवरील माधुर्याने माणसे जोडली जातात.

# औद्योगिक सुरक्षा दिन



या राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह अभियानाअंतर्गत भारत सरकारच्या, सेंट्रल लेबर इन्स्टिट्यूट मार्फत औद्योगिक सुरक्षा रथ नावाची एक बस हाफकिन महामंडळाच्या परळ विभागामध्ये दिनांक १५.०३.२०१८ रोजी आली होती. या औद्योगिक सुरक्षा रथामध्ये औदयोगिक सुरक्षा संबंधी सेफ्टी गॉगल, सेफ्टी शुज, सेफ्टी उपकरणे, याविषयी माहिती देण्यात आली होती.







## राष्ट्रीय सुरक्षा अभियान स्पर्धेतील विजेते कर्मचारी



कामावर सुरक्षा नियम मोडू नका,
जीवनाशी आपले संबंध तोडू नका

समजून समजून काम करा
पाळा सारी सुरक्षा ।।
कशाला माझ्या हातातल्या
विषाची घेता परीक्षा ।।
शत्रू असूनही सांगतो
तुमच्या फायदयाची बात।।
मी आहे अपघात

जीवन का यही है नारा,
सुरक्षा भरा हो परिवार हमारा

**श्री. राजेंद्र रा. जंगम**

घेवून सुरक्षा अभियान
करु सर्वांना सज्ञान
सुरक्षेसंबंधी कोणी राहणार नाही अज्ञान

**श्री. दयानंद मोरे**

चलना है दूर तक,
खुद को आजमाने के लिए ।
सेफ्टी शुज पहनकर चलो,
मंजिल को पाने के लिए ।।

दुनियाभरकी खुबसुरती,
आँखो मे बसाने के लिए ।
सेफ्टी ग्लास पहनले बंदे,
सपनों को सजाने के लिए ।।

**श्री. जितेंद्र तांबे.**

आता असुद्या एकच ध्यास
सुरक्षेविना नाही विकास

**श्री. पराग गंगावणे**

**सामर्थ्य हे सांगण्याची अथवा पाहण्याची वस्तू नसून, वेळ आल्यावर कृती करण्याची ती गोष्ट आहे.**




# औद्योगिक सुरक्षा दिन

## राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह अभियाना अंतर्गत आयोजित सुरक्षा स्पर्धेतील विजेत्या अधिकारी आणि कर्मचारी यांच्या निवडक सेफ्टी कविता, चारोळी, स्लोगन, पोस्टर

### सेफ्टी कविता

कारखान्यात अपघातग्रस्त झालेल्या व नोकरी गमावलेल्या कामगाराची व्यथा या कवितेतून मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

मनाने नाही केला तेव्हा विचार
आयुष्य जगतो आहे होऊन मी बेजार
नाही केला कधी सुरक्षित साधनांचा वापर
म्हणून जीने जगतो मी लाचार

कधी होतो सुखी मी आणि माझा परिवार
मृत्यूनी दिली हुलकावणी तरी पडला अपंगत्वाचा वार
आता माझाच पडला माझ्या कुटुंबावर भार
म्हणून जीने जगतो मी अपंगाचे लाचार

वणवण फिरतो मी कामासाठी होऊन बेकार
पहातो कुणी देतो का मला आपला आधार
तेव्हा केला नाही मी सुरक्षिततेचा विचार
म्हणून जीने जगतो मी अंपगाचे लाचार

शेवटी सांगतो मी करा सर्वांनी सुरक्षित साधनांचा आचार
क्षणोक्षणी करा आपला व आपल्या कुटुंबाचा विचार
पालन करा सुरक्षित सूचना नियमांचे वारंवार
आणि जगू नका जीने अपंगाचे लाचार.

**श्री. नितिन ल. तिर्लोटकर**
**(परळ विभाग)**

पोलिओ लसचे करूनी उत्पादन
हाफकिन देते संजीवन
निर्जंतूक हालचालींचे ठेवू भान
पोलिओ लस ठरेल जीवनदान

********

जैविक कच-याची लावू योग्य विल्हेवाट
सुरक्षेच्या बाबतीत नको कुठलीही काटछाट

**श्रीमती प्राची सुशांत तारे**

सुरक्षेच्या जोडीने
उत्पादन वाढेल तोडीने

**श्री. सचिन सिताराम जगताप**

मशिन आपली माता
सांभाळा तिची मर्जी
वेळोवेळी घ्या काळजी
नका करु हलगर्जी

**श्री. प्रशांत आंबवडे**

स्वच्छ सुरक्षित उत्पादन प्रक्रिया
सुरक्षित कार्याचीच आहे हि विदया।।

**श्री. सखाराम के. माळी**

देईल जो तंबाखू - गुटख्याला साद
होईल तो आयुष्यातून बर्बाद

**श्री. दिगंबर राणे**

सुरक्षा नियमों को बना के ढाल,
मुसीबतो को भगाडाल

**श्री. गुलाब किरवले**

नका करु सेल्फीचा नाद,
नाही तर होईल जीवनाचा घात

**श्री. विनायक भांगरे**




⇦ कु. स्वराज प्रशांत आंबवडे

श्री. बिरजू वसंत पवार



काम करताना
काळजी घ्या स्व:ताची
वाट बघतेय घरी फॅमिली तुमची

**कु. सोनाली बुरकुले**

उत्पादन कामात असायला हवी,
गुणवत्ता आणि शिस्त
कारण दर्जेदार औषधावरच आहे
रुग्णांची भिस्त

**श्री. प्रशांत आंबवडे**

कामात आनंद निर्माण केला की त्याचे ओझे वाटत नाही.

# कामगार प्रशिक्षण वर्ग

'एखादया कंपनीमधील सर्व कामगारांमध्ये, मग ते कामगार कोणत्याही संघटनेचे सभासद असो वा कोणत्याही जाती,धर्म, पंथाचे असोत त्यांच्यामध्ये एकोपा, बंधुत्व व समानतेची भावना निर्माण करून राष्ट्रविकास, कंपनीचा विकास, कुटुंबाचा विकास आणि स्वव्यक्तीमत्व विकास साधावा' या उद्देशाने भारत सरकारच्या सेंट्रल बोर्ड फॉर वर्कर्स एज्युकेशन या संस्थेने '४५ दिवसांचा कामगार प्रशिक्षण कार्यक्रम' सुरु केला आहे.

या कार्यक्रमाअंतर्गत प्रथमच हाफकिन महामंडळाच्या प्रतिविष व रक्तजल विभाग, पिंपरी येथे २० जून २०१८ पासून कामगार प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात आला. कामगार प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. हाफकिन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले याप्रसंगी सेंट्रल बोर्ड फॉर वर्कर्स एज्युकेशन या संस्थेचे संचालक श्री. चंद्रसेन जगताप, श्री. अमित डोंगरे, कामगार कल्याण अधिकारी आणि श्री किरण रा. जाधव कामगार शिक्षक आणि कामगार प्रशिक्षणातील कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमांतर्गत दररोज संध्याकाळी ३.०० ते ६.०० वाजेपर्यंत महामंडळाचे कामगार कल्याण अधिकारी, मान्यताप्राप्त कामगार शिक्षक आणि बाहेरील वक्त्ये यांच्यामार्फत विविध विषयांवर कामगारांना प्रशिक्षण देण्यात येते. या कार्यक्रमामध्ये हाफकिन महामंडळाचे कामगार कल्याण अधिकारी श्री. अमित डोंगरे, कामगार शिक्षक श्री किरण रा. जाधव आणि श्री. प्रदिप आचरेकर यांनी महामंडळातील कर्मचा-यांना विविध विषयांवर प्रशिक्षण दिले. पुणे येथील सेंट्रल बोर्ड फॉर वर्कर्स एज्युकेशन या संस्थेचे संचालक श्री चंद्रसेन जगताप यांनी देखील कामगारांना 'बदलती औदयोगिक परिस्थिती आणि नवीन उत्पादनाच्या प्रणाली' याविषयी मार्गदर्शन केले.

प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये पुणे येथील एनडीए खडकवसला ॲकेडमी, वनाझ कंपनी यासारख्या कंपन्यांना शैक्षणिक भेट देण्यात आली.

कामगार प्रशिक्षण कार्यक्रम प्रथमच हाफकिन महामंडळाच्या प्रतिविष व रक्तजल विभाग, पिंपरी येथे सुरु करण्याकरीता माननीय मंत्रीमहोदय श्री. गिरीश बापट यांनी पुढाकार घेतल्यामुळे माननीय मंत्रीमहोदयांचे विशेष आभार. तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक श्रीमती सीमा व्यास यांनी कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता आर्थिक खर्चास मान्यता दिल्यामुळे महोदयांचे आभार. कार्यरत व्यवस्थापकीय संचालक श्रीमती संपदा मेहता आणि महाव्यवस्थापक उत्पादन श्री. सुभाष शंकरवार यांनी या कार्यक्रमाकरिता सकारात्मक पाठिंबा आणि प्रोत्साहन दिल्याबद्दल सदर कार्यक्रम

या कामगार प्रशिक्षण कार्यक्रमादरम्यान कामगार कल्याण अधिकारी अणि कामगार शिक्षक यांच्यामार्फत खालील विषयांवर कर्मचा-यांना प्रशिक्षण देण्यात आले.

- आंतरराष्ट्रीय श्रम संघटना
- व्यसनाधिनता
- संभाषण कौशल्य
- भारतीय राज्यघटना
- कारखाना कायदा
- व्यक्तीमत्व विकास व संभाषण कौशल्य
- ग्राहक कायदा
- कार्यनिती
- वेळेचे व्यवस्थापन
- कामगार शिक्षण म्हणजे काय ? का ? कसे ?
- जादू टोणा विरोधी कायदा
- बदल व्यवस्थापन
- कामगार चळवळीचा इतिहास
- कामगार कल्याण मंडळाच्या सुविधा व लाभ
- कामगार संघटनांचा इतिहास
- उत्पादन व उत्पादकता
- औद्योगिक संबंध
- आगीपासून सुरक्षा
- योग प्रशिक्षण
- कामगार कायदे






आनंदी राहण्याचा साधा एकच मंत्र आहे, अपेक्षा स्वत:कडूनच ठेवा, समोरच्याकडून नाही.

हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाचे
हाफकिन वृत्त

# कामगार प्रशिक्षण वर्ग

यशस्वीरित्या पूर्ण होत आहे यामुळे माननीय महोदयांचे शतशः आभार. कामगार प्रशिक्षण कार्यक्रम हा भारत सरकारच्या सेंट्रल बोर्ड फॉर वर्कर्स एज्युकेशन या संस्थेमार्फत हाफकिन महामंडळामध्ये चालविण्यात येतो. पुणे येथील सेंट्रल बोर्ड फॉर वर्कर्स एज्युकेशनचे संचालक श्री चंद्रसेन जगताप यांचे या कार्यक्रमाकरिता मोलाचे सहकार्य लाभले याबद्दल त्यांचे आभार.

## शैक्षणिक भेटीची छायाचित्रे



थायसन क्रुप


महिंद्रा कंपनी


वनाज कंपनी


एन.डी.ए.

## जागतिक योग दिन





२१ जून या जागतिक योग दिनानिमित्त हाफकिन महामंडळाच्या परळ, पिंपरी आणि जळगाव येथे कर्मचाऱ्यांनी योगसाधना करून योगादिन साजरा केला. परळ विभागामध्ये हाफकिन अजिंठा फार्मा. लि.चे महाव्यवस्थापक श्री. घनश्याम सुपे यांनी उपस्थित योगसाधकांना मार्गदर्शन केले. प्रतिविष व रक्तजल पिंपरी विभाग येथे योग शिक्षक श्रीमती अनिता झांबरे यांना कर्मचाऱ्यांना योगसाधना शिकविण्याकरिता निमंत्रित करण्यात आले होते. हाफकिन अजिंठा फार्मा. लि जळगाव येथे कर्मचाऱ्यांनी योगसाधना करून योगादिन साजरा केला.



## कामाच्या ठिकाणी महिलांना संरक्षण विषयी प्रशिक्षण

हाफकिन महिला अंतर्गत तक्रार निवारण समितीवरील अशासकिय सदस्या डॉ. अनघा सरपोतदार यांनी हाफकिन महामंडळातील महिला अधिकारी आणि कर्मचारी यांना कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ ( प्रतिबंध, मनाई, निवारण) २०१३ या कायद्याविषयी प्रशिक्षण दिले.







जेंव्हा सगळचं संपुन गेलयं असं आपल्याला वाटतं, तीच खरी वेळ असते नवीन काहीतरी सुरू करण्याची.

# मुंबई पोलिसांचे सायबर सुरक्षेविषयी विशेष अभियान




''तुमचा बायोडेटा शॉर्टलिस्ट झाला असून तुम्हाला अबक या नामांकित कंपनीमध्ये जॉब लागला आहे. याकरिता तुम्ही खालील नमूद बँकेच्या खाते क्रमांकावर १०,००० रुपये भरावे आणि अबक कंपनीच्या दिल्ली येथील ऑफिसमध्ये येवून नेमणूकपत्र घ्यावे.'' असे ई-मेल तुम्हाला आल्यास किंवा ''मी बॅकेतून कर्मचारी बोलत आहे. बँकेचे तुम्ही चांगले ग्राहक असल्यामुळे तुम्हाला बँकेतून विशेष क्रेडिटची सुविधा देण्यात येत आहे. याकरिता तुमचा मोबाईलवर आलेला ओटीपी नंबर मला दयावा;'' अशा प्रकारचा कोणताही फोन आल्यास अथवा ''वरील मॅसेज १० ठिकाणी फॉरवर्ड केल्यास तुमच्या मोबाईलचे रिचार्ज होईल'' असे मॅसेज व्हाटस्‌ॲपवर आल्यास अथवा ''आमच्या लॉटरी कंपनीकडून महिन्यातून एकदा एका भाग्यवान विजेत्यास आम्ही ५ कोटी रु. देतो. तुम्हाला सांगण्यास अत्यंत आनंद होतो की, या महिन्याची लॉटरीचे भाग्यवान विजेते म्हणून तुमच्या नावाची घोषणा करण्यात आलेली आहे. लॉटरीची रक्कम मिळविण्याकरिता खालील नमूद लिंकवर क्लीक करा आणि तुमची व तुमच्या बँकेच्या खात्याची माहिती भरुन पाठवा. माहिती पाठविल्यानंतर २ दिवसांत तुमच्या खातेक्रमांकावर १ कोटी रुपये रक्कम जमा होईल.''

अशा प्रकारचे ई-मेल, मॅसेज आल्यास सर्वसाधारण नागरिक अशा मॅसेजला प्रतिसाद देतात व आपली व आपल्या आर्थिक व्यवहारांची, बॅकेविषयी माहिती लगेच देतात परिणामी ते सायबर चोरीला बळी पडतात. व त्यांच्या बँक खात्यामधून रक्कम वळती होवून ती रक्कम चोरांना मिळते. मोबाईल, स्मार्टफोन, इंटरनेटच्या डिजीटायझेशन युगामध्ये यासारखे मॅसेज पाठवून होत असलेल्या पैशांच्या चोरीचे प्रमाण दरदिवशी वाढत आहे. सायबर चोरांना पकडणे मात्र कठीण झाले आहे. यासारख्या सायबर चोरीला आपण बळी पडू नये याविषयी विस्तृत माहिती देण्याकरिता मुंबई पोलिसांचे सायबर युनिटच्या पोलिसांनी जागृत मुंबईकर अभियान सुरु केले आहे. या अभियांनांतर्गत मुंबई पोलिसांचे सायबर युनिट प्रत्यक्ष विविध कंपन्या, संस्था, सोसायटया इत्यादिंना भेटून तेथील कर्मचा-यांना, नागरिकांना सायबर गुन्हयांविषयी माहिती सांगत आहेत.

दिनांक २१/०२/२०१८ रोजी हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळामध्ये मुंबई पोलिसांचे सायबर युनिटने येवून महामंडळातील कर्मचा-यांना सायबर गुन्हे याविषयी जनजागृती केली.



**खालील गोष्टींची काळजी घेतल्यास आपले एटीएम कार्ड आपण सुरक्षित ठेवू शकतो.**

- बँकेतून नवीन एटीएम कार्ड मिळाल्यानंतर त्यासोबत आलेला पीन नंबर बदलणे
- आपले एटीएम कार्ड दुस-या व्यक्तीकडे सोपवू नये, पीन कोणत्याही अनोळखी व्यक्तीला सांगू नये.
- एटीएम कार्ड क्रमांक, सीव्हीसी क्रमांक कोणालाही देवू नये.
- एटीएम कार्डाचा वापर करुन ऑनलाईन व्यवहार करताना मोबाईलवर येणारा ओटीपी इतर कोणासोबत शेअर करु नये.

**इंटरनेट बॅकिंग वापरताना खालील गोष्टींची काळजी घेतल्यास ऑनलाईन व्यवहार करताना आपला व्यवहार आपण सुरक्षित ठेवू शकतो.**




- आपण वापरत असलेला वेब ब्राउझर सुरक्षित आहे का तपासणे.
- शक्यतो वेब ब्राउझर अपडेटेड व्हर्जन वापरावं ते अधिक सुरक्षित असतं.
- इंटरनेट बँकिंगचा पासवर्ड नियमितपणे बदलत राहावा.
- आपलं स्वत:चं नाव, जन्मतारीख, प्रिय व्यक्तीचं नाव यांनी बनलेला पासवर्ड वापरणं टाळावं.
- आपल्या कॉम्पूटर, लॅपटॉपमध्ये चांगला ऍण्टीव्हायरस वापरावा.
- इंटरनेट बँकिंग लॉगिन केल्यानंतर यापूर्वी लॉगिन कधी करण्यात आलं होतं त्याची माहिती दाखविण्यात येते. पूर्वीचं लॉगिन आपल्याद्वारेच करण्यात आलं होतं याची खात्री करुन घ्यावी.
- इंटरनेट कॅफे, पब्लिक वायफायवरुन इंटरनेट बँकिंग अकाउंट लॉगिन करु नये.
- टू फॅक्टर ऑथेंटिकेशन चा वापर करावा.
- ब्राऊझरला आपल्या इंटरनेट बँकिंगचे युजरनेम किंवा पासवर्ड सेव्ह करण्याची परवागनगी देवू नये.



**मोबाईल बँकिंगचा वापर करताना खालील काळजी घ्यावी**

- आपल्या बँकेचे अधिकृत ॲप आहे तेच फक्त वापरावं. आपण वापरतं असलेलं ॲप अधिकृत आहे का ते बँकेकडून तपासून घ्यावं.
- आपल्या एटीएम कार्डची माहिती सेव्ह करण्याची परवानगी शक्यतो कोणत्याही ॲपला देवू नका.
- एसएमएस किंवा ई-मेलद्वारे येणा-या अनोळखी मॅसेजमधील लिंकवर क्लीक करण्याचा मोह टाळावा.
- आपल्या बँकेतून बोलतोय, आपल्या खात्याबाबत; तसचं डेबिट, क्रेडिटची माहिती द्या असे सांगणारा फोन आल्यास माहिती देवू नका.

कचऱ्यात फेकलेले जेवण हेच दर्शवते की, पोट भरलं की माणूस आपली भूक आणि लायकी विसरुन जातो.

# कामगारांचा सत्कार

महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाने १ मे २०१८ या जागतिक कामगार दिनाचे औचित्य साधून सामाजिक क्षेत्रामध्ये उल्लेखनिय कार्य केलेल्या मुंबई जिल्हयातील १० कामगारांचा सत्कार केला. यापैकी हाफकिन महामंडळाच्या परळ विभागातील गुणनियंत्रण विभागामध्ये फार्मासिस्ट या पदावर कार्यरत असलेले श्री किरण राजाराम जाधव आणि मौखिक पोलिओ विभागामध्ये उत्पादन सहायक वर्ग 'क' या पदावर कार्यरत असलेल्या श्रीमती विनया केतन नार्वेकर यांचा सत्कार करण्यात आला.




**श्री. किरण राजाराम जाधव** हे मागील ३१ वर्षांपासून हाफकिन महामंडळामध्ये कार्यरत आहेत. ते भारत सरकारच्या सेंट्रल बोर्ड फॉर वर्कर्स एज्युकेशन या संस्थेचे मान्यताप्राप्त 'कामगार शिक्षक' म्हणून प्रमाणित आहेत. त्यामुळे ते महामंडळातील कामगारांना व्यसनाधीनता, वेळेचे व्यवस्थापन, व्यक्तिमत्व विकास, अंधश्रध्दा निर्मुलन, याविषयावर प्रशिक्षण देतात. श्री. किरण राजाराम जाधव हे महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाला जादू टोणा विरोधी कायदयाचा प्रचार व प्रसार करण्याकरिता सहकार्य करित आहेत. या कामाकरिता अखिल भारतीय अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे ते सहसंघटक म्हणून कार्यरत आहेत. भारत सरकारच्या डिपार्टमेंट ऑफ टेक्नोलजी या विभागाने त्यांना 'रिसोर्स पर्सन' म्हणून मान्यता दिल्यामुळे ते संपूर्ण भारतभर अंधश्रध्दा निर्मूलन याविषयावर अधिकृतरित्या समाजप्रबोधन करु शकतात. मुंबई पोलिस दलातील दिवंगत वरिष्ठ पोलिस अधिकारी कै. हेमंत करकरे आणि प्रसिध्द मानसोपचारतज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी यांनी वर्ष २००० साली 'जिज्ञासा' नावाचा प्रोजेक्ट सुरु केला आहे. या प्रोजेक्टच्या माध्यमातून शाळेतील मुलांना लैंगिक शिक्षणाची माहिती, व्यसनमुक्ती, ताणतणाव व्यवस्थापन आणि व्यवसाय मार्गदर्शन करण्यात येते. या प्रोजेक्टच्या माध्यमातून मागील १२ वर्षे श्री. जाधव हे महानगरपालिकेच्या शाळांमध्ये जाऊन विदयार्थ्यांना मार्गदर्शन करीत आहेत. सामाजिक क्षेत्रामध्ये श्री किरण जाधव यांनी केलेल्या उल्लेखनिय कार्याबदद्ल महाराष्ट्र शासनाच्या कामगार कल्याण मंडळाने त्यांचा शाल, श्रीफळ, व स्मृतिचिन्ह देवून गौरव केला. श्री. किरण रा. जाधव यांचे हार्दिक अभिनंदन.

कामगार शिक्षक श्री. किरण राजाराम जाधव यांचे वडील कै. राजाराम अप्पासाहेब जाधव यांचे दिनांक १३ जुलै २०१८ रोजी खानापूर तालुक्यातील आळसंद गावामध्ये अल्पशा आजाराने निधन झाले. श्री. किरण जाधव यांनी स्वतःच्या वडिलांचे कराड येथील कृष्णा मेडिकल हॉस्पिटलमध्ये देहदान केले. याकरिता त्यांनी स्वतःच्या आईला, नातेवाईकांना, गावक-यांना तसेच सरपंच यांना देहदानाचे महत्व पटवून दिले. व त्यांच्याकडूनही या दानास होकार संपादन केले. सांगली जिल्यातील खानापूर तालुक्यामध्ये प्रथमच देहदान झाले आहे. श्री. किरण जाधव यांनी देहदानाविषयी केलेल्या जनप्रबोधनामुळे हे सामाजिक कार्य पार पडले. श्री. किरण जाधव यांच्यासारखे पुरोगामी विचारसरणीचे कामगार शिक्षक आज हाफकिन महामंडळामधील कामगारांना प्रशिक्षण देण्यासाठी आहेत याचा अभिमान वाटतो.



**श्रीमती विनया केतन नार्वेकर** या मागील २३ वर्षांपासून हाफकिन महामंडळामध्ये कार्यरत आहेत. त्या हाफकिन महामंडळाच्या सुरक्षा समिती आणि महिला अंतर्गत तक्रार निवारण समितीवर मान्यताप्राप्त कामगार संघटनेच्या प्रतिनिधी सदस्या आहेत. हाफकिन सहकारी कामगार पतसंस्थेच्या संचालकपदी मागील ३ वर्षांपासून त्या कार्यरत आहेत. श्रीमती विनया नार्वेकर यांनी वर्ष २०१३ साली एका ५ महिन्यांच्या लहान मुलीला दत्तक घेतले आहे याविषयी हाफकिन महामंडळाने महिला दिनानिमित्त त्यांचा जाहिर सत्कार केला होता. 'बेटी बचाव आणि बेटी पढाव' याविषयी त्या कामगारांमध्ये जनजागृती करीत आहेत. सामाजिक क्षेत्रामध्ये श्रीमती विनया नार्वेकर यांनी केलेल्या उल्लेखनिय कार्याबदद्ल कामगार कल्याण मंडळाने त्यांचा शाल, श्रीफळ, व स्मृतिचिन्ह देवून गौरव केला. श्रीमती विनया नार्वेकर यांचे हार्दिक अभिनंदन.

# कामगारांचा सत्कार

दरवर्षी ११ जुलै हा जागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा करण्यात येतो. यावर्षी जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त फक्त एक अपत्यानंतर कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया केलेल्या सुखी जोडप्यांचा महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडून सत्कार करण्यात आला. हाफकिन महामंडळाच्या प्रतिविष व रक्तजल विभाग, पिंपरी विभागातील कर्मचारी श्री राजेश प. नेटके यांचा सपत्नीक आणि परळ, मुंबई विभागातील श्रीमती नंदिनी नंदकुमार सावंत यांचा दिनांक ११ जूलै २०१८ रोजी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडून शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह आणि रूपये ५०००/- बक्षिस देवून सत्कार करण्यात आला. याबदद्ल **श्री राजेश प. नेटके** आणि **श्रीमती नंदिनी नंदकुमार सावंत** यांचे विशेष हार्दिक अभिनंदन.





महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडून दरवर्षी संपूर्ण महाराष्ट्रातील सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा, संगीत, इत्यादी क्षेत्रांमध्ये उल्लेखनिय कामगिरी केलेल्या ५१ कामगारांना 'गुणवंत कामगार पुरस्कार' देण्यात येतो. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडून अधिकृतरीत्या वर्ष २०१५-२०१६ करिता हाफकिन महामंडळातील दोन कामगारांची निवड 'गुणवंत कामगार' पुरस्कारासाठी झालेली आहे. भांडार विभागातील कार्यालय सहाय्यक या पदावर कार्यरत असलेले कर्मचारी श्री. दिनेश नामदेव जगताप आणि प्रतिविष व रक्तजल विभाग पिंपरी येथे उत्पादन सहा. वर्ग 'ई' या पदावर कार्यरत असलेले कर्मचारी श्री. कृष्णा ढोकळे यांना महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचा वर्ष २०१५-२०१६ करिताचा 'गुणवंत कामगार' पुरस्कार जाहिर झाला आहे. शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, मानपत्र आणि रूपये १५०००/- रोख बक्षिस असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. लवकरच माननीय मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य आणि माननीय कामगार मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडून सदर पुरस्कार महामंडळातील या दोन कामगारांना देण्यात येणार आहे.
**श्री. दिनेश ना. जगताप** आणि **श्री. कृष्णा सु. ढोकळे** यांचे हार्दिक अभिनंदन !!



श्री. दिनेश ना. जगताप



श्री. कृष्णा सु. ढोकळे

हाफकिन अजिंठा फार्मास्युटिकल्स् लिमिटेड, जळगाव येथे लघुलेखक व टंकलेखक या पदावर कार्यरत असलेले कर्मचारी **श्री. अनिलकुमार दरेकर** यांनी १५ ऑगस्ट २०१८ या स्वातंत्र्यदिनी हजरत बिलाल मल्टीपर्पज सोसायटी, जळगाव या संस्थेने आयोजित केलेल्या 'देशभक्तीपर गीत गायन स्पर्धेमध्ये' प्रथम क्रमांक मिळविला आहे. हजरत बिलाल मल्टीपर्पज सोसायटी संस्थेकडून श्री दरेकर यांचा 'ढाल' बक्षिस देवून सत्कार करण्यात आला. हाफकिन महामंडळाच्यावतीने श्री अनिलकुमार दरेकर यांचे हार्दिक अभिनंदन !!





# दृढ इच्छाशक्तीने केली व्यसनाधिनतेवर मात



श्री राजेंद्रकुमार सुदाम आमले यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला

हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाच्या प्रतिविष व रक्तजल विभाग येथे तबेला क्षेत्र सहा. वर्ग 'ब' या पदावर कार्यरत असलेले श्री राजेंद्रकुमार सुदाम आमले या कामगाराची हि सत्य कथा आहे. २१ ऑगस्ट १९७० रोजी श्री राजेंद्रकुमार सुदाम आमले यांचा जन्म चाकण येथे झाला. दारुची हातभट्टी चालविणे हा वडिलांचा मूळ व्यवसाय होता. त्यामुळे दारु हे द्रव्य त्यांच्या कुटुंबाचे उदरनिर्वाह चालविण्याचे मूळ साधन बनले होते. आणि लहानपणापासूनच दारुची हातभट्टी कशी चालवायची याचे त्यांना प्रशिक्षण वडीलांकडूनच मिळाले होते. वयाच्या अवघ्या १४ वर्षापासून श्री आमले हे दारु पीवू लागले आणि त्याचबरोबर तंबाखूचे व्यसनही जडले. दिवसभर दारु पिणे, आणि बेधुंद अवस्थेत मौजमजा करणे हा त्यांचा दिनक्रम झाला. वयाच्या २१व्या वर्षी त्यांच्या नशिबाने त्यांना साथ दिली आणि हाफकिन महामंडळाच्या पिंपरी विभागात त्यांना कंत्राटी तत्वावर काम मिळाले. परंतु वडिलांनी चालू केलेल्या दारुभट्टीमुळे त्यांचा व्यवसाय तेजीत होता. गावातील अनेक पुरुष दारुच्या आहारी गेले होते त्यामुळे त्यांचा संसार उध्वस्त होवू लागला; अशावेळी ही दारुभट्टी बंद व्हावी याकरिता गावक-यांनी राजेंद्रकुमार आमले यांच्या वडिलांना 'दारुभट्टी बंद करा त्याबदल्यात आम्ही तुम्हाला इतर ठिकाणी चांगली जमीन भेट देतो' असे सांगितले. गावक-यांच्या आक्रमकपणामुळे शेवटी राजेंद्रकुमार आमले यांच्या वडिलांनी दारुभट्टी बंद केली. व गावक-यांनी दिलेल्या जमिनीवर शेती करायचे ठरविले. परंतु काही दिवसांनी त्या जमिनीचा मूळ मालक आला व त्याने ती जमिन आमले यांच्या वडिलांकडून परत घेतली. आता दारुभट्टीही नाही आणि जमिनही नाही. हा धक्का सहन न झाल्यामुळे त्यांच्या वडिलांचे निधन झाले. वयाच्या १४व्या वर्षापासून राजेंद्रकुमार यांनी दारुची बाटली जी प्रथम तोंडाला लावली ती काही सुटेना. दिवसेंदिवस त्यांचे व्यसन वाढू लागले. दारु पिऊन ते रस्त्यावर अनेकदा पडायचे, झोपायचे, रस्त्यातील खड्डयांमध्ये देखील ते अनेकदा पडले होते. दारु पिऊन रस्त्यावर शिवीगाळ करणे, मारामारी करणे यामुळे त्यांचे कुटुंबिय देखील बदनाम झाले होते. राजेंद्रकुमार यांनी अनेकदा दारु सोडण्याचा प्रयत्न केला परंतु दारु पिण्याच्या इच्छेला ते बळी पडत व पुन्हा दारु प्यायला सुरुवात करीत. एकदा एस.टी. बसची धडक देखील लागली परंतु सुदैवाने ते बचावले. दारुच्या व्यसनापासून त्यांना परावृत्त करण्यासाठी कुटुंबियांनी भरपूर प्रयत्न केले परंतु ते सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. राजेंद्रकुमार यांची दारु सोडवयाचीच असा दृढ निश्चय शेवटी गावक-यांनी केला. गावक-यांनी राजेंद्रकुमार यांना सातारा जिल्हयातील फलटण तालुक्यातील जाधव महाराज वडजलकर यांच्याकडे नेले. ते संत ज्ञानेश्वरांचे निस्सिम भक्त आहेत. त्यामुळे जाधव महाराज वडजलकर यांनी संत ज्ञानेश्वरांचे प्रवचन,भजन या गोष्टींमध्ये राजेंद्रकुमार यांना अडकविले.

सकाळ संध्याकाळ भक्तीरसामध्ये राजेंद्रकुमार यांची आवड निर्माण केली. देवाच्या कृपेनी मिळालेल्या या जीवनाचा खरा अर्थ राजेंद्रकुमार यांना पटवून दिला. यावेळी राजेंद्रकुमार यांचे संपूर्ण कुटुंबाने तसेच गावक-यांनी देखील त्यांना साथ आणि प्रोत्साहन दिले. विठ्ठल माऊली आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या भक्तीरसामध्ये ते एवढे गुंतले की त्यांना आता जिवनाचा खरा अर्थ समजला. त्यांच्या मनामध्ये दारु आणि तंबाखुचे व्यसन थांबविण्याविषयी इच्छाशक्ती निर्माण झाली. चांगले काय आणि वाईट काय याची समज निर्माण झाली. राजेंद्रकुमार हे एक वारकरी झाले. ते शिर्डीला पायी चालत जावू लागले. कोणतेही औषध न घेता केवळ दृढ इच्छाशक्तीच्या जोरावर राजेंद्रकुमार आमले यांनी दारुचे व्यसन सोडले. मागील ६ वर्षापासून त्यांनी दारु आणि तंबाखूचे सेवन केलेले नाही. याविषयी त्यांना पूर्वी आणि आता च्या काळात फरक काय जाणवतो असे विचारल्यावर त्यांनी, '' एकदम छान वाटते, एक चांगले आयुष्य मी जगतोय, लोकांच्या मनामध्ये माझेविषयी आदर आणि मानसन्मान वाढलाय. खरं आयुष्य काय हे मला समजले.'' यावर्षी १५ ऑगस्ट २०१८ या स्वातंत्र्यदिनी व्यवस्थापक प्रतिविष व रक्तजल विभाग डॉ. शिवाजी गाडे यांच्या हस्ते श्री राजेंद्रकुमार सुदाम आमले यांचा सपत्नीक शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देवून जाहिर सत्कार करण्यात आला. राजेंद्रकुमार आमले यांच्यासारखे कामगार हे कौतुकास पात्र आहेत. केवळ दृढ इच्छाशक्तीच्या जोरावर व्यसनाधिनतेवर मिळविलेल्या विजयाचे राजेंद्रकुमार आमले हे जिवंत उदाहरण आहेत.

**योग्य ठिकाणी मिळालेली अयोग्य वागणूक माणसाला त्याच्या विचाराचे आणि जीवनाचे प्रवाह बदलण्यास भाग पाडतात.**

# श्रध्दांजली



## डॉ. बी. के. गोयल

हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. बी. के. गोयल यांचे दिनांक २०.०२.२०१८ रोजी हृदय विकाराच्या झटक्याने निधन झाले. ते ८२ वर्षांचे होते. हाफकिन महामडळामध्ये वर्ष १९८२ ते वर्ष १९९५ या कालावधीमध्ये ते महामंडळाचे अध्यक्ष होते. सर्वसामान्य तसेच गरजू रूग्णांना उत्तम वैद्यकिय सेवा देणारे डॉक्टर म्हणून त्यांची ख्याती होती. वैद्यकीय क्षेत्रातील मौल्यवान योगदानाबद्दल भारत सरकारने डॉ. बी. के. गोयल यांना पद्मश्री (१९८४), पदम्भूषण (१९९०) आणि पद्मविभूषण (२००५) अशा नागरी सन्मानाने सन्मानित केले होते. डॉ. बी. के. गोयल हे नामांकित हृदयरोग तज्ज्ञ होते. हृदय विकार शास्त्रातील प्रगाढ अभ्यास आणि अनुभवांमुळे देशाच्या कानाकोप-यातून डॉ. गोयल यांच्याकडे रूग्णांचा ओघ असे. १९९० मध्ये भारताचे तत्कालीन राष्ट्रपती डॉ. शंकर दयाळ शर्मा यांना दिल्लीतील रूग्णालयात दाखल केले होते तेव्हा त्यांच्या उपचारासाठी डॉ. गोयल यांना पाचारण करण्यात आले होते. जयपूर हि डॉ. गोयल यांची जन्मभूमी. राजस्थानातील एका खेडयात एक व्यक्ती हृदय विकाराने मरताना पाहिली तेव्हाच गोयल यांनी डॉक्टरकी करायचे ठरविले होते. खान अब्दुल गफार खान म्हणजे सरहद गांधी यांच्यावरील शस्त्रक्रियेमुळे डॉ. गोयल यांचे नाव सर्वतोमुखी झाले.

डॉ. गोयल बॉम्बे हॉस्पिटल इन्स्टिटयुट ऑफ मेडिकल सायन्सच्या कार्डीओलॉजी विभागाचे प्रमुख होते. त्यासोबतच जे. जे. गुप ऑफ हॉस्पिटल्स् आणि मुंबईच्या ग्रँण्ट मेडिकल कॉलेजमध्ये कार्डीओलॉजीचे डायरेक्टर -प्रोफेसर म्हणून कार्यरत होते. देशातील पहिले इंटेसीव्ह केअर युनिट (आय.सी.यु) आणि मोबाईल कोरोनरी केअर युनिट स्थापन करण्याचे श्रेय त्यांना जाते. हाफकिन महामंडळ, कार्डीओलॉजी सोसायटी ऑफ इंडीया, असोसिएशन ऑफ फिजीशयन, नॅशनल सोसायटी ऑफ प्रिव्हेन्शन ऑफ हार्ट डिसीजेस आणि अमेरिकन कॉलेज ऑफ चेस्ट फिजीशीयन यांसारख्या नामांकित संस्थांमध्ये त्यांनी अध्यक्षपद भूषविले होते. अवध्या २९ व्या वर्षी जे. जे. रूग्णालयातील हृदयरोग विभागाचे प्रमुख म्हणून त्यांची नियुक्ती झाली होती. देशातील पल्स् पोलिओ अभियान, इंडियन रेड क्रॉस सोसायटी, इंडो अमेरिकन सोसायटी ऑफ कार्डिओलॉजी, धन्वंतरी फांऊँडेशन येथेही त्यांनी भरीव काम केले. हयुस्टन स्थित टेक्सास हार्ट इन्स्टिटयुटमध्येही त्यांनी हृदयरोग तज्ज्ञ सल्लागाराचे पद भूषविले होते. भारतीय सैन्य दलाच्या विभागाचेही ते हृदयरोग तज्ज्ञ सल्लागार होते. राज्यपालांच्या वैदयकिय सल्लागार चमूमध्येही त्यांचा सहभाग होता. वयाच्या २९व्या वर्षी ते मुंबईचे नगरपाल होते. हाफकिन महामंडळाचे १४ वर्षे अध्यक्ष म्हणून त्यांनी कार्यभार सांभाळला होता. त्यांच्या पुढाकारातूनच पोलिओची लस निर्मिली गेली असून त्याला जागतिक आरोग्य संघटनेची मान्यता देखील मिळालेली आहे. दक्षिण मुंबईतील प्रभात या निवासस्थानी मंगळवारी न्याहरी केल्यानंतर सकाळी १०.३० वाजण्याच्या सुमारास डॉ. गोयल हृदयविकाराच्या झटक्याने खाली कोसळले. त्यानंतर त्यांच्या मुलाने उपचार करण्याचा प्रयत्न केला. पुढे ब्रिजकॅण्डी रूग्णालयामध्ये दाखल करण्यात आले. रूग्णालयामध्ये उपचार चालू असतानाच त्यांचे निधन झाले. 'हार्ट टॉक' हे डॉक्टर गोयल यांनी लिहिलेले पुस्तक अनेक भाषांमध्ये प्रसारित झाले. दिलदार हृदयाचे डॉ. बी. के. गोयल यांना अखेर हृदयविकारानेच गाठले हा दुर्देवी योगायोग.

५० वर्षांहून अधिक वर्षाच्या वैद्यकीय सेवाकाळात डॉ. गोयल यांनी गरीब श्रीमंत असा भेदभाव न करता निस्पृह भावनेने रूग्णसेवा केली. डॉ. गोयल हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे हृदयविकार तज्ज्ञ तर होतेच याशिवाय ते उत्तम वैदयकीय शिक्षण तज्ज्ञ देखिल होते. हृदयविकार क्षेत्रात अत्याधुनिक वैदयकिय संशोधन आणि तंत्रज्ञान आणून त्यांनी आरोग्यसेवेत मोठे योगदान दिले. अशा या पुण्यवंत माणसाच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना.

## डॉ. कानू दवे

हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाचे माजी व्यवस्थापकीय संचालक डॉ. कानू दवे यांचे दिनांक ३१.०८.२०१७ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. ते ९० वर्षांचे होते. डॉ कानू दवे यांनी M.B.B.S हि पदवी आणि M.D. Virology हि पदविका G. S. Medical College येथून पूर्ण केली होती. वयाच्या २२ व्या वर्षी ते हाफकिन संस्थेमध्ये पोलिओ व्हायरस आणि पोलिओ लसीचे संशोधन व उत्पादन करण्यासाठी नियुक्त झाले. १९४९ साली त्यांनी पोलिओ व्हायरस आणि पोलिओ लसीवरील संशोधन आणि चाचणी विषयी काम केले. १९४९ साली देशात सर्वप्रथम हाफकिनमध्ये पोलिओ लसीचा विकास व उत्पादन करण्याचे काम डॉ. कानू दवे व त्यांच्या सहका-यांनी सुरू केले. या कार्यासाठी ते अमेरिकेमध्ये जाऊन पोलिओ लसींचे जनक डॉ. सॅबीन यांना भेटले. व डॉ सॅबीन यांच्यामुळे त्यांना पोलिओ लस निर्मीतीचे आधुनिक तंत्रज्ञान समजले. पुढे मास्को रशिया यथे चुमाकोव इन्स्टिटयुट येथे जावून पोलिओ लसीचे तंत्रज्ञान डॉ. दवे यांनी आत्मसात केले व १९६५ साली भारतामध्ये सर्वप्रथम पोलिओ लस निर्मिती तसेच गुणवत्ता चाचणीसाठी अद्ययावत इमारत व



# डॉ. कानू दवे

श्रध्दांजली

प्रयोगशाळेची निर्मिती केली व भारताला पोलिआ लस उत्पादनामध्ये स्वयंपूर्ण बनविण्याची मुहूर्तमेढ रचून पोलिओ लस उत्पादनाचा भक्कम पाया रचला ज्यामुळे पुढील ५० वर्षे भारत देशास दर्जेदार पोलिओ लसींचा मुबलक प्रमाणात पुरवठा उपलब्ध झाला जेणेकरुन पोलिओचे भारतातून समूळ उच्चाटन शक्य झाले. डॉ कानू दवे यांनी १९८१ ते १९८२ या कालावधीत हाफकिन महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार सांभाळला होता.

१९७० साली डॉ. कानू दवे आणि त्यांच्या सहका-यांनी हाफकिन महामंडळाच्या प्रवेशद्वाराजवळ दर रविवारी फक्त १० पैशांमध्ये पोलिओचा डोस देण्याची मोहिम राबविली होती. या मोहिमेला जनतेकडून उस्फुर्त प्रतिसाद मिळाला होता. पोलिओ डोस घेण्याकरिता हाफकिनमध्ये होत असलेली गर्दी पाहून फुगेवाले, खेळणीवाले, कपडेवाले यांसारखे व्यावसायिक दर रविवारी येऊ लागले. व दर रविवारी हाफकिन परिसरामध्ये जत्रा भरु लागली. पुढे भारत सरकारला या पोलिओ रविवार विषयी व त्यास जनतेकडून मिळत असलेल्या प्रतिसादाबाबत समजल्यावर राष्ट्रीय स्तरावर पोलिओ रविवार मोहिम सुरु झाली.

दिनांक ११ फेब्रुवारी २०१४ रोजी भारतामध्ये मागील ३ वर्षांत एकही पोलिओ रुग्ण न आढळल्यामुळे भारत देशास 'पोलिओ मुक्त देश' म्हणून जागतिक आरोग्य संघटनेने जाहिर केले. ५ फेब्रुवारी २०१४ मध्ये हाफकिन महामंडळाने सर्व माजी व्यवस्थापकीय संचालक यांना निमंत्रित करुन त्यांचा सत्कार करण्याकरिता एका समारंभाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाच्या सत्कारमूर्तींमध्ये डॉ कानू दवे हेदेखील उपस्थित होते.

१९८२ साली डॉ कानू दवे सेवानिवृत्त झाले; पुढे सेवानिवृत्ती नंतर देखील डॉ कानू दवे यांनी आंत्रविषाणू अनुसंधान केंद्र या केंद्र सरकारच्या मुंबई विभागात संचालक म्हणून कार्यभार सांभाळला होता. अशा या महान संशोधक शास्त्रज्ञाचे दिनांक ३१.०८.२०१७ रोजी निधन झाले. ईश्वर त्यांच्या पुण्यात्म्यास चिरशांती देवो हीच प्रार्थना !!

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे माहिती शिबीर



महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडून कामगारांना कोणते फायदे, सुविधा मिळतात याकरिता चार दिवसांचे माहिती शिबीर हाफकिन महामंडळाच्या परळ विभाग येथे दिनांक २७.११.२०१७ ते दिनांक ३०.११.२०१७ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. याशिबीराच्या माध्यमातून महामंडळातील कामगारांना महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडून मिळणा-या फायदयांची माहिती समजली.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडून कामगारांना मिळणारे फायदयांचा लाभ हा केवळ कामगार सदस्यापूरता मर्यादित न राहता तो लाभ संपूर्ण कुटूंबातील सदस्यांनादेखील मिळतो. हे कामगारांना समजल्यावर कामगारांच्या कुटुंबातील महिला सदस्यांकरिता महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळामार्फत प्रथमच ब्युटीपार्लर कोर्स आयोजित करण्यात आला होता. सदर कोर्सचे प्रशिक्षण हाफकिन वसाहतीमधील बालवाडीमध्ये महिलांना देण्यात आले. या कोर्सचे शुल्क केवळ रु. ५० होते. त्यामुळे कामगारांच्या कुटुंबातील महिला सदस्यांची या कोर्सकरिता असलेली मागणी पाहता सलग दोन वेळा महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडून ब्युटीपार्लर कोर्सचे आयोजन करण्यात आले. कोर्स पुर्ण झाल्यानंतर सर्व महिला प्रशिक्षणार्थींना महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडून प्रमाणपत्र देण्यात आले. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे सहाय्यक कामगार कल्याण आयुक्त श्री. नंदलाल राठोड, कामगार कल्याण अधिकारी श्री. साबळे आणि श्री. नाठाळकर आणि श्रीमती कांबळे यांनी सदर कोर्स खास हाफकिन मंहामडळातील कामगार व कामगारांच्या कुटुंबातील महिला सदस्यांकरिता आयोजित केल्याबदद्ल सर्वांचे मनपूर्वक आभार.






मोठे विजय मिळवायचे असतील तर मोठे रीस्क हे घ्यावेच लागतील.

## डॉ रविंद्र चव्हाण



Fresh out of medical college, I started my Practice way back in 1980 at a remote village, Akale, near Chiplun in Konkan region. Even today, in 2017, this village and adjoining localities lack adequate basic connectivity in terms of Electricity, Water, Roads, Public Transport and Communication. To say the least, one can only imagine the plight of villagers in earlier years. Loss of lives was common, as patients would be deprived of timely medical attention & help. To make things worse, villagers would suffer acute financial crisis as 'Money Orders' received from relatives working in Mumbai as Girni Kamgars and Pensions would be the prime source of livelihood.

In such precarious sitautions, I along with my wife (also a Doctor, who joined me after initial years) started practice and within no time, patients ranging from Pregnacies till Snake/Scorpio bites started pouring in. This area is notoriously famous for Ultra Poisonous Scorpios which gives very little time & margin of error for Doctor to diagnose and act.

Dr. Natu sensed the need of the hour and took active initiatives along with Haffkine Institute to develop an effective vaccine on Snake/Scorpio bites. I am using this vaccine since the times it was available for Rs. 18, it is now available for Rs. 604, time flies & how. It has been a long journey, I have been able to serve innumerable patients, resulting in saving precious lives.

With immense satisfaction, I owe my sincere gratitude towards Haffkine Institute, Mumbai.

**Dr. Ravindra Chavan, Chiplun (Dist. Ratnagiri) -** +91 99210 44909

## श्री. संकेत ताराचंद बावकर



मी, संकेत ताराचंद बावकर, सिंधुदूर्ग जिल्हयातील कुडाळ गावचा आहे. मी एक सामाजिक कार्यकर्ता असून महाराजा ग्रुप या सामाजिक संस्थेचा संस्थापक - अध्यक्ष आहे. तसेच माननीय माजी मुख्यमंत्री श्री नारायण राणेसाहेब यांच्या स्वाभिमान संघटनेचा दक्षिण मुंबई जिल्हयाचा संपर्क प्रमुख म्हणून कार्यरत आहे. माझे संपर्कातील सिंधुदूर्ग व उर्वरित कोकण विभागातील शेतकरी व डॉक्टर यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार आपल्या महामंडळाच्या ॲण्टी स्नेक व्हेनम आणि ॲण्टी स्कॉर्पीयन व्हेनम या औषधांमुळे अनेक गोरगरीब लोकांचे प्राण वाचले आहेत. कोकण विभागामध्ये मुख्यत्वेकरून मण्यार, नाग, फुरसे, घोणस हे साप मोठया प्रमाणात आढळतात. तसेच घरातील कौलांमध्ये, पेंडयांमध्ये विंचू आढळतात. काम करताना कळत नकळत या प्राण्यांशी आमचा संपर्क येतो आणि सर्पदंश आणि विंचूदंश झाल्यामुळे अनेक लोक मृत्यूमुखी पडतात. परंतु या वर्षभरामध्ये आपल्या महामंडळाचे औषध उपलब्ध झाल्यामुळे लोकांचे प्राण वाचू शकले आहेत. चिपळूण येथील डॉ. चव्हाण, डॉ. बावस्कर यांच्याकडे आपल्या हाफकिन महामंडळाची औषधे उपलब्ध असतात. त्यामुळे आमच्या कोकणातील लोकांना एक आधार मिळाला आहे.

हाफकिन महामंडळासारखी शासकीय कंपनी खरोखरच गोर-गरीबांकरिता वरदान आहे. खाजगी कंपन्यांची अनेक इंजेक्शन देऊन देखील रूग्णाचे प्राण वाचतील की नाही याची खात्री नसते. परंतु हाफकिन महामंडळाची पाच ते दहा इंजेक्शनने रूग्णांचे प्राण वाचले आहेत. आपल्या औषधांची गुणवत्ता खूपच चांगली आहे. ती अशीच चांगली रहावी. माननीय नारायण राणे साहेब यांनी देखील हाफकिन महामंडळाच्या कार्याची दखल घेवून महामंडळाचे कौतुक करून महामंडळाला शुभेच्छा दिलेल्या आहेत.

हाफकिन महामंडळ आज आरोग्य क्षेत्रामध्ये गोरगरीब लोकांकरिता जे महत्वपूर्ण कार्य करीत आहे. त्याकरिता आपले पुन्हा एकदा अभिनंदन आणि हाफकिन महामंडळाच्या पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा !!!

# सबसे बडा रोग क्या कहेंगे लोग......
# वनाझ कंपनीची सत्य गोष्ट



कोथरूड पुणे येथील वनाझ इंजिनिअर्स कंपनीची ही सत्य गोष्ट आहे. वर्ष १९४९ साली व्यँकय्या नागराज आणि एस. के. खांडेकर यांनी एक इलेक्ट्रॉनिक्स कंपोनंट बनविणारी छोटी कंपनी मुंबई प्रभादेवी येथे सुरू केली. कंपनीचा व्यवसाय वाढला तेव्हा त्यांनी पुणे येथील कोथरूडला मोठी जमीन घेवून वनाझ इंजिनिअर्स नावाची कंपनी सुरू केली. गॅस सिलेंडरसाठी रेग्युलेटर बनविणे हे एकमेव उत्पादन आणि याचा पुरवठा भारत सरकारला करणे हा एकमेव ग्राहक. वनाझ ची बाजारपेठेमध्ये मोनोपॉली होती. सर्व काही सुरळीत चालू होते. कंपनीला भरघोस नफा मिळत होता. वर्ष १९८२-८३ साली तत्कालीन भारत सरकारने सिलेंडरचे रेग्युलेटर बनविण्याचे कंत्राट इटलीतील एका नामांकीत कंपनीला दिले. त्यामुळे प्रथमच १९८२-८३ साली कंपनीला तोटा झाला. व तो पुढील वर्षांमध्ये वाढतच गेला. कंपनीचे दुसरे काही उत्पादन नसल्यामुळे कंपनी बंद पडण्याच्या मार्गावर आली. शासनाने कंपनीला सीक युनिट म्हणून घोषित केले. कामगारांना पगार द्यायलाही कंपनीकडे पैसे नव्हते. बाजारामध्ये कंपनीविषयी वाईट गोष्टी पसरू लागल्या. आता ही कंपनी बंद पडणार असे बाहेरील लोकं बोलू लागली. त्यामुळे या कंपनीत काम करणारे कामगारांचे नातेवाईक, मित्रमंडळी त्यांना ‘कंपनी बंद पडणार’? असे विचारू लागले. कामगारांमध्ये नैराश्य पसरले. त्यामुळे घरातील सदस्य व इतर नातेवाईक यांचे ऐकून कामगारांनी व्हीआरएस घेवून काम सोडले. परंतु बाहेरील लोकांच्या चर्चेला न घाबरता ५२५ कामगार वनाझ कंपनींच्या मालकांना भेटले व कंपनी बंद करू नका, कंपनी चालू ठेवण्यासाठी आम्ही शक्य होईल तेवढे करू असे त्यांना सागितले. त्यांची जिद्द आणि उत्साह पाहून कंपनीच्या मालकांनी कंपनी बंद करण्याचा विचार सोडून दिला व कंपनी पुन्हा कशी सुरु होईल असा विचार करू लागले. कंपनीचे मालकांनी रतन टाटा यांची भेट घेवून त्यांना सहकार्य करण्याची विनंती केली. यावेळी रतन टाटा यांनी पुण्यातील टाटा मोटर्स कंपनीचे गाडयांचे पार्ट बनविण्याचे कंत्राट वनाझ कंपनीला दिले. यापूर्वी कधीही वनाझने गाडयांचे पार्ट बनविले नव्हते. काम नवखे होते परंतु महत्वाचा प्रश्न भांडवल कसे जमा करायचे हा होता. त्या ५२५ कामगारांनी याकरीता जनता सहकारी बँकेकडून प्रत्येकी २५,०००/- रुपयांचे पर्सनल लोन काढले आणि ती रक्कम वनाझ कंपनीच्या मालकांना दिली. तरी थोडे भांडवल कमी पडल्यामुळे मालकांनी कोथरूड येथील काही प्रमाणात कंपनीची जमीन स्टेट बँकेला विकून उरलेले भांडवल जमा केले. तोपर्यंत ते ५२५ कामगार कोणताही पगार न घेता नित्य नियमाने कामावर येत होते व कंपनीची देखभाल व स्वच्छता करीत होते. टाटा मोटर्सने दिलेल्या डिझाईन प्रमाणे कामगार काम करून गाडयांचे पार्ट बनवू लागले. पूर्वी ३५००रुपये प्रतिमहिना पगार घेणारे कामगार आता १२०० रुपये प्रतिमहिना एवढया पगारावर काम करु लागले. तरी देखील ते आनंदी होते. १९८७ साली बंद झालेल्या कामगारांच्या सुविधा १९९९ सालापासून टप्प्या-टप्प्याने सुरु होवू लागल्या. कंपनीने कामगारांनी काढलेले पर्सनल लोन बँकेला फेडले. सगळी परिस्थिती २०११ साली चांगली झाली. बाहेरील लोकांची नकारात्मक प्रतिक्रिया न ऐकता वनाझ कंपनीच्या कामगारांनी परिस्थितीशी २८ वर्षे लढा दिला आणि ते जिंकले. कंपनीने फक्त एकाच उत्पादनावर अवलंबून न राहण्याचे ठरविले. उत्पादनांच्या श्रृंखला वाढविल्या. कंपनीने पवनचक्या बांधल्या व त्यातून निर्माण होणारी वीज पुणे येथील हॉस्पिटला विकू लागले. एलपीजी गॅसचे रिफील स्टेशन बांधले. आज वनाझ कंपनीची महाराष्ट्राच्या बाहेर १०० हून अधिक एलपीजी गॅसचे रिफील स्टेशन्स आहेत. कामगारांना आता १५ टक्के बोनस, २००० रुपये हजेरी बोनस आणि नफ्याच्या ५टक्के उत्पादनाशी निगडीत बोनस मिळू लागला आहे. अनुदानित तत्वावर उपहारगृह सुविधा आहे. कामगार व त्यांच्या कुटुंबियांकरिता उच्च दर्जाची मेडिक्लेम इंशुरन्स पॉलिसी कंपनीने काढली आहे. कोथरुड येथे कंपनीने जागा घेवून कामगारांकरिता केवळ ५००००/- रुपयांमध्ये हक्काची घरे बांधून दिली आहेत. कामगार आणि मालक यांच्यातील करार होवू लागला, सेवा निवृत्ती नंतर देखील कामगारांच्या मुलांना कंपनीमध्ये कामावर घेण्यात येवू लागले. कामगारांनी त्यावेळी १०रुपये प्रतिशेअर कंपनीचे शेअर खरेदी केले होते त्याची आज ५५०/-रु. प्रतिशेअर एवढी किंमत आहे. कंपनीच्या उत्पादनांना मोठया प्रमाणावर मागणी असल्यामुळे कंपनीला कोथरुड येथे आता जागा कमी पडू लागली आहे व कंपनी आता शिरवळ येथे मोठया जागी स्थलांतरीत होणार आहे. आजही कंपनीला प्रशासकीय कामाकरिता वाहन खरेदी करायची असल्यास फक्त टाटा कंपनीचीच वाहने ते खरेदी करतात. आज कंपनीमध्ये कामगार - मालक किंवा कामगार-कामगार वाद होवून तो न्यायालयामध्ये जावू नये व कंपनीची प्रतिष्ठा मलीन होवू नये म्हणून तेथील एकमेव अंतर्गत मान्यताप्राप्त कामगार संघटना सदैव कार्यरत असते.

महाराष्ट्र शासनाने वनाझ कंपनीला ‘नारायण मेघाजी लोखंडे कामगार मित्र पुरस्कार’ देवून गौरविले आहे. सीक युनिट ते महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार हा प्रवास वनाझ कंपनीने व तेथील कामगारांनी लोकांचे न ऐकता केवळ स्वतःवर आणि स्वतःच्या कतृत्वावर विशवास ठेवून केला आहे. लोक, नातेवाईक, मित्रमंडळी काय म्हणतात हा विचार वनाझच्या वाईट परिस्थितीवेळी व्हीआरएस घेतलेल्या कामगारांप्रमाणे त्या ५२५ कामगारांनी केला असता तर आज वनाझ कंपनी बंद असती. एक महत्वाची गोष्ट म्हणजे चढ-उतार हे आयुष्याचे दोन पैलू आहेत. लोकं तुमच्याविषयी, तुमचा उदयोगधंदा, व्यवसाय, कंपनी विषयी काय म्हणतात याला महत्व न देता आपल्याला काय करायचे आहे याला महत्व देणे हे फार महत्वाचे असते.

**कष्ट इतक्या शांततेत करावं की यश धिंगाणा घालेल.**

हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाचे
हाफकिन वृत्त

# डॉ. हाफकिनची गोष्ट



इ.स.१८७० च्या दशकातील ही डॉ. वाल्देमार मोर्देकाय हाफकिनची गोष्ट आहे. रशियातील बदर्यान्स्क या शहरातील मोर्देकाय हाफकिन यांचा लहान मुलगा वाल्देमार हाफकिन यांचे शालेय शिक्षण संपले होते. परीक्षेत वाल्देमार यांचा पहिला नंबर आला होता. त्यामुळे शहरातील महाविद्यालयामध्ये प्रवेश नक्कीच मिळणार होता. परंतु आता पुढील शिक्षणासाठी ओदेसा या शहरामध्ये कसे पाठवायचे हा प्रश्न त्यांच्या वडीलांना पडला होता. परंतु वाल्देमार हाफकिनचे एकच ध्येय होते की, 'मला पुढे शिकायचे आहे'. या वेळी वाल्देमार हाफकिन यांचा मोठा भाऊ पुढे आला व पुढील शिक्षणासाठी होणा-या खर्चाची मदत करायला तो तयार झाला. मोठया भावाचे शिक्षण अपुरे होते व तो एका ठिकाणी नोकरी करीत होता. आपले शिक्षण पुर्ण नाही झाले म्हणून वाल्देमारचे तरी पूर्ण व्हावे ही त्याची इच्छा होती. मोठया भावाने पैशांची व्यवस्था केली. आणि वाल्देमार हाफकिन यांना गावापासून ३०० मैल दूर असलेल्या ओदेसा शहरामध्ये पुढील शिक्षणाकरिता पाठविले. वाल्देमार हाफकिन यांचे एकच स्वप्न होते, त्यांना संशोधक व्हावयाचे होते. त्यावेळी रशियामध्ये ज्यू लोकांविरुध्द वातावरण गरम होते. रशियामधील दारिद्रय हे ज्यू लोकांमुळेच आलेले आहे असा समज धरुन रशियन जनता ज्यूं विरोधी उठाव करीत होती. ज्यू लोकांना फारच हालअपेष्टा, अपमान, कोंडमारा सहन करावा लागे. त्यामुळे कित्येक होतकरू ज्यू विदयार्थांना शिक्षण घेणे कठीण झाले होते. अनेक ज्यू तरूण घातपाती कृत्ये करणा-या संघटनांमध्ये सामील होत. त्यामुळे त्यांना झारच्या तुरुंगात डांबून ठेवले जायचे तर काहींना फाशी दिली जात होती. याअशा कठीण प्रतिकूल परिस्थितमध्ये वंशाने ज्यू असलेले वाल्देमार हाफकिन यांच्या पुढे दोन मार्ग होते. एक म्हणजे आपल्या ज्ञातिबांधवांसाठी स्वार्थत्याग करायचा आणि संघटनांमध्ये सामील होणे. आणि दुसरा म्हणजे शास्त्राध्ययनाने संशोधक बनायचे आणि आपल्या ज्ञातीचे नाव उजळ करायचे यापैकी वाल्देमार हाफकिन यांनी दुसरी गोष्ट स्विकारली.

विश्वविद्यालयामध्ये वाल्देमार हाफकिन यांचा विशेष संबंध आला तो जीवशास्त्राचे प्राध्यापक प्रो. मेच्निकोव्ह यांच्याशी. जंतूंवर त्यांचे संशोधन चालू असे पुढे याच प्राध्यापकांना नोबेल पारितोषिकदेखील मिळाले. प्रो. मेच्निकोव्ह सारखे गुरु वाल्देमार यांना लाभले या बाबतीत ते सुदैवी ठरले. मोठया भावाने पाठविलेल्या दरमहा दहा रुबलमध्ये वाल्देमार शिकत होते. राहण्यासाठी चांगली जागा नव्हती, जेवणाला पुरेसे पैसे न उरल्यामुळे कित्येक वेळा ते उपाशी रहात असे. परंतु ज्ञानाच्या साधनेमध्ये वाल्देमार इतके गर्क होते की, या उणिवांकडे त्यांचे लक्ष जात नसे. आपल्या ज्यू समुदायाला न्याय कसा काय मिळवून दयायचा या विषयी ते नेहमी विचार करीत असे. 'जनतेची इच्छा' नामक ज्यू लोकांची एक दहशतवादी संघटना होती. वाल्देमार हे तरुण असल्यामुळे ज्यू लोकांवरील अन्यायाविरुध्द लढायला त्यांचे रक्त सळसळत होते. पोलिसांनी वाल्देमार हाफकिन यांना अटक केली परंतु हाफकिन यांच्या खोलीत काही आक्षेपार्ह न आढळल्यामुळे पोलिसांनी त्यांना सोडले व त्यांच्यावर सक्त नजर ठेवली. त्यामुळे हाफकिन यांच्यामध्ये अबोलापण, घुमेपणा आला. आपल्या मताच्या प्रचारासाठी ते कोणाशी वादविवाद करीत नसे. पुढे १ मार्च १८८१ रोजी सेंट पिटर्सबर्ग येथे बॉम्बचा स्फोट होवून झार दुसरा अलेक्झांडर मारला गेला. झारला ज्यूंनी मारले असा समज पसरवून ज्यू लोकांना अमानुषपणे मारण्यात आले. काहींना तडीपार करण्यात आले. त्यामुळे वाल्देमार हाफकिन यांना पोलिसांनी पकडले परंतु त्यांचे गुरु प्रो. मेच्निकोव्ह यांच्या वजनामुळे हाफकिन सुटले. प्रो. मेच्निकोव्ह यांनी 'ज्या वयामध्ये ज्ञानाची साधना करावयाची, त्या वयात हे असले भलतेसलते उद्योग आणी उपद्व्याप करू नका' अशी समज हाफकिन यांना दिली. परंतु हाफकिन यांच्या तरुण सळसळत्या रक्ताला त्यांच्या गुरुंचे म्हणणे तितकेसे पटले नाही. शासनाने दहशतवादी चळवळयांना दडपून टाकण्यासाठी स्त्रोल्निकोव्ह या क्रुर अधिका-याची खास नेमणूक केली. या स्त्रोल्निकोव्हला ठार मारण्याच्या कटामध्ये अनेक संघटना सामील होत्या. हाफकिन या चळवळीमध्ये ओढला गेला. ज्या तारखेला स्त्रोल्निकोव्हला मारायचे होते त्याच दिवशी हाफकिनला पोलिसांनी पकडले व तुरुंगामध्ये टाकले. त्यावेळेचे तुरुंग म्हणजे नरक असे. नीट बसायला देखील जागा नसे, जमीनीला खाचखड्डे, गारगार जमिनीवर चारआठ दिवस झोपले की, कैद्याला न्युमोनिया किंवा क्षय होई. कुत्रा देखील तोंड लावणार नाही असे अन्न कैद्यांना देण्यात येत असे. कोणी याविषयी तक्रार केली तर ''तडफडून मर, तुही सुटलास आम्हीही सुटलो'' असे सांगण्यात येई. या अशा तुरुंगामध्ये हाफकिनला ठेवण्यात आले होते. त्यावेळी त्यांना गुरु प्रो. मेच्निकोव्ह यांचे म्हणणे पटू लागले. पुढे सुदैवाने हाफकिन सुटले. या चळवळींपासून ते आता लांब राहू लागले.

'जीवजातींची उत्पत्ती' हा महान ग्रंथ लिहिणा-या चार्ल्स डार्विन यांच्या समाधीवर पुष्पहार अर्पण करण्यासाठी महाविद्यालयातील विदयार्थांनी वर्गणी जमा करण्याचे ठरविले. शिक्षण मंत्र्यांना हे समजल्यावर त्यांनी या विदयार्थांची धरपकड करण्याचे आदेश दिले. याविषयी प्रो. मेच्निकोव्ह चिडले व त्यांनी विश्वविदयालय सोडून जाण्याचा निर्णय घेतला. पण जर प्रो. मेच्निकोव्ह सारखे प्राध्यापकांनी विश्वविद्यालय सोडले तर विश्वविद्यालय बंद होईल व त्यांना थांबविण्यात यावे म्हणून सर्व विदयार्थांनी सह्यांची मोहिम राबविली व त्या सहयांचे पेपर्स विश्वविद्यालयाच्या अधिका-यांकडे पाठविले. सहया करणा-या विदयार्थांना विश्वविद्यालयातून काढूनही टाकण्यात येईल हे माहित असतानादेखील हाफकिन यांनी आपल्या गुरुंसाठी सही केली. पुढे प्रो. मेच्निकोव्ह यांना थांबविण्यात आले व धरपकड झालेल्या विदयार्थांना सोडण्यात आले. मध्यंतरीच्या तुरुंगवासामुळे हाफकिन यांचा सर्व आधार तुटला होता. जेवण, राहणे, पुस्तके, फी याकरिता हाफकिन यांनी शिकवण्या सुरु केल्या. ते सकाळी श्रीमंतांच्या मुलांना त्यांच्या घरी जावून शिकवू लागले आणि रात्री स्वतःचा अभ्यास करू लागले. कोणाशी एक नाही दोन नाही. हाफकिन यांना परिक्षेत घवघवीत यश मिळाले. त्यामुळे विश्वविद्यालयात प्राध्यापकाची त्यांना नोकरी मिळत होती परंतु ज्यू धर्म सोडून ख्रिस्ती धर्माची दिक्षा घेणे अनिवार्य होते. हाफकिन यांना हे पटले नाही त्यांनी ती नोकरी नाकारली. पुढे एका प्राणि संग्रहालयात ते तांत्रिक नोकर म्हणून काम करू लागले. काही दिवसांनी हाफकिन यांनी रशिया सोडून स्वित्झर्लंड गाठले. तेथे जिनिव्हा विश्वविद्यालयात शरीर शास्त्राचे प्राध्यापक म्हणून त्यांची नेमणूक झाली. गुरु प्रो. मेच्निकोव्ह हे पॅरिस येथील पाश्चर संस्थेमध्ये काम करीत होते. प्रो. मेच्निकोव्ह यांना आपला शिष्य हाफकिन आपल्याबरोबर असावा म्हणून त्यांनी हाफकिन यांना सहायक ग्रंथपाल पदाची नोकरी देवू केली. हाफकिन यांच्या पदाला ही नोकरी शोभणारी नव्हती परंतु पाश्चर सारख्या नामांकित संस्थेमध्ये काम करण्याची संधी त्यांना मिळणार होती. ते लगेचच पाश्चर संस्थेमध्ये रुजू झाले. सकाळी ग्रंथपाल सहायक व रात्री प्रयोगशाळेमध्ये ते संशोधन करू लागले. आणि जेव्हा वेळ मिळेल तेव्हा आवडीचे व्हायोलीन ते वाजवित असे. एके दिवशी आनंदाचा क्षण आला. पाश्चर संस्थेचे प्रमुख डॉ रॉक्स यांचे मदतनिस संशोधक यार्सिन इडोची हे प्लेगवर संशोधन करीत होते परंतु काही कारणास्तव त्यांना ते संशोधन अर्ध्यावर सोडून निघून जावे लागले. परंतु निघण्यापूर्वी त्यांनी लिहीले होते, ''माझे जागी वाल्देमार हाफकिन यांची नेमणूक करावी कारण त्यांना प्रयोगशाळेविषयी इत्यंभूत माहिती आहे''. या पत्रातील दोन ओळींनी डॉ वाल्देमार मोर्देकाय हाफकिन यांचे आयुष्य बदलले वयाच्या ३० व्या वर्षी ते संशोधक म्हणून पाश्चर संस्थेमध्ये नियुक्त झाले.

**विश्व वैज्ञानिक - डॉ हाफकिन, द. शि. टकले, लोकवाड्मय गृह या पुस्तकातुन.**

# रिमझिम झरती श्रावणधारा

सकाळचा प्रहर, रविबिंब ब-यापैकी पुर्वक्षितीजावर आले असावे, संधीप्रकाशाचा मंदपणा केव्हाच लोपला होता, काळे कभिन्न मेघ मनास सैरभैर करत होते. मनःपटलावर का कोणजाणे ? पाउसगाण्यांची रुंजी सुरु झाली. पहिल्यांदी आठवले ज्ञानेश्वर माउलींचे

घन वाजे घुनघुना । वारा वाहे रुनझुना ।।

लगेचच मंगेश पाडगावकरांच्या ओळींनी फेर धरला -

श्रावणात घन निळा बरसला । रिमझिम रेशीमधारा
उलगडला झाडांतून अवचित । हिरवा मोर पिसारा ।।

संस्कृत वाङ्यमयातील पावसाचे वर्णन मला नेहमीच मोहमय अत्यंत लोभस वाटते. दोन महाकाव्यातील पावसाच्या वर्णनाचे व त्या संपुर्ण महाकाव्यात मुकनायक म्हणून वावरणारा पाउस याचे मला झालेले आकलन विवेचित करण्याचा केलेला प्रयत्न.

उपखंडातील भारत वर्ष, खरेतर हा उष्णकटीबंध आणि म्हणूनच ४ महिन्यांचा वर्षा ऋतुचा काळ हा पावसाळा मनस्वी, देखणा, मन झिम्माड करणारा, पहिली सर, मृदंगंध, रुप, रस, गंध सारेच चिंबचिंब, तृणांकुर, टवटवणारा प्रतिभेचा अंकुर, पुर्णपणे झोकून दयावे असे वाटणारा क्षण, सारेच कसे विलक्षण.

वेदवाङ्यमयात ऋषीमुनींनी पर्जन्यसुक्त गायली आहेत. निसर्गातील हा कल्लोळ विलोभनीय, प्रसंगी भयकंप करणारा रुद्रावतार, देव स्वरुप समजून त्यांची स्तोत्र रचिली, पर्जन्याची गर्जना, ढगांचे आडदांड रुप, त्याचे कोसळणे काहीसे भयप्रद. पावसाच्या रथाचे घोडे चौफेर उधळणारा पर्जन्यदेव जो सृजनाचा दाता, तुमचा आमचा मायबाप सृजनाची शिंपन करताना स्तवनाची देखील अपेक्षा करतो. वसिष्ठमुनी सांगतात ''पर्जन्याय प्रगायत् ।''

मंडुकसुक्तात त्याचे गुणगाण आहे. काही वेळा त्याचा अतिरेक होतो. परिणामी जीव घेणी अतिवृष्टी. मग पर्जन्यशांती, वृष्टी थांबविण्याची विनंती, हे ओघानेच. हे झाले पावसाचे. स्थुल, सौम्य व प्रसंगी आक्रमक होणारे रुप.

आदिकवी वाल्मीकींच्या रामायणातील किष्किंधा कांडातील पावसाळयाचे वर्णन निखळ विलोभनिय जणु काही एखादी भावकविता. सीताहरणानंतर मौनात गेलेल्या प्रभु रामचंद्रांचा मुक्काम माल्यवान पर्वतावर होता. तिन्हीसाजेवेळी काळया ढगांनी पर्वताला वेधले. हा बदल सारीच सृष्टीच पालटून टाकणारा होता. धारांचे तांडव बघताना प्रभु श्रीराम बोलते झाले. सृष्टींच्या रंगमंचावरचे हे विलक्षण नाट्य वाल्मीकींनी हळुवार रेखाटले आहे. त्यांनी चितारलेल्या पावसाचे चित्र केवळ सृष्टीचे भौतिक रुप दाखवतातच त्याचबरोबर अनंतरंगी दुनियेतील प्रभु रामचंद्रांच्या विरानीचे सुरही त्यात अलगद मिसळले आहेत.

वर्षाविश्वाचा ठसा नंतरच्या कालखंडात उमटविला तो कविकुलगुरु कालिदास यांनी लोकोत्तर, नवनवोन्मेषशालिनी प्रतिभा लाभलेला हा निसर्गकवी सृजनाचा आलौकिक खेळ बघून त्याच्या प्रतिभेला अगणीत धुमारे फुटले नाहीत तरच नवल. ''ऋतुसंहार'', हे सहाही ऋतुचे उठावदार चित्र रेखाटण्यासाठी रचलेले काव्य. केवळ आपल्या प्रियेसाठी तिच्या डोळयांसमोर पर्जन्याचे विलक्षण चित्र उभाकरण्यासाठी कालीदासांची प्रतिभा जणु काही ''तेजाने ज्योतीची आरती''. एकाच वेळी आवेगाचा वसंतबहार त्याचवेळी दुसरीकडे विरहाचा पुरिया छेडणारा पाउस अवर्णनिय.

दुसरे प्रवाही महानाट्य, महाकाव्य मेघदुत. यामधील कविकुलगुरु कालिदासाच्या प्रतिभेचा वेलु गगनावरी गेल्याची ठायीठायी येणारी प्रचिती विलक्षण. वास्तविक पाहता या नाटयाचा खरा नायक मेघच आहे. व यक्षाचे नायकपण या नाटयाला आधार देणारे. या मेघाचा प्रवास रामगीरी ते अलकानगरी. पण या प्रवासवाटेवर मेघाच्या नजरेने आसमंतातून न्याहाळताना कालिदासाने द-या, नदया, झरे, पशुपक्षी, दिवस, रात्र, चांदण्या व बरेच काही, व हे सर्व साकारताना या पाउसचित्रात भरलेले रंग थक करणारे. पाउसचित्र, चित्रच न राहता, त्यामध्ये गेयता आली आहे, ती आसमंतातील चलबिचल, वर्णगंधांची उधळण, वा-याची झुळझुळ, पाखरांची किलबिल, पानाफुलांची सळसळ, नदी झ-याची खळखळ, द-या खो-याचे हुकांर, डोंगर पहाडांची साद व त्यात मानवीस्पंदनांचा सुर. प्रसन्नस्वरांची मैफील. प्रत्येक चित्राचे रंग वेगळे, भावतरंग वेगळे, पहिल्या शिडकाव्याचा रोमांच, मेघासोबत असणारे राजहंसाचे थवे, मेघाच्या वाटेवर तोरण बांधणारे वगळे, वरच्यावर थेंब झेलणारे चातक, थिरकणारे मोरे, कदंबावरची केसर, हिरवी पिवळी फुले, कर्दळीचे कोंब, पिवळया प्रभेची केतकीवणे, गडद चांभुळबण, अंतरीक्षातून संचार करणा-या यक्षकिन्नरांना इंद्रधनुच्या पार्श्वभुमीवर या मेघाचे रुप जणु काही मोरपिस खोचलेला बाळकृश्णच असे भासले. परंतु या काव्यचित्र मैफिलीला कारुण्याचा, विरहाचा झालेला विलक्षण स्पर्श आनंदी मानवी मनात कालवा कालव निर्माण करतो व हाच मेघमल्हार. रामगीरीवरील यक्षाचा विरह तिकडे अलकानगरीत त्याच्या प्रियेचा विरह चितारताना कालिदासाने पावसाचे आगळे रुप प्रकट केले आहे. या मेघमल्हारची तान, उंची नंतर कोणालाच गाठता आली नाही.

शुद्रकाच्या मृच्छकटिक मधील पाउस हा अकाली, थैमान घालणारा, वाकणारा, गरजणारा, अंधारलोटणारा आहे. अशाही घनघोर वातावरणात वसंतसेना अभिसारिका होवून चारुदत्ताला भेटावयास जाते. मेघमल्हारातील ही सुखद, सुफल मैफील. उतरु येणा-या नभानं खरेतर मन झिम्माड झालय. स्पंदनातील विरोधाभास, चित्तातील विरोधाभास, एकाच वेळी प्रसन्नता व त्यापाठोपाठ येणारी खिन्नता, विराणी, विलक्षण अनुभती रोमारोमात भरुन राहिली.

**जगदीश व्ही. कुलकर्णी**
प्रभारी व्यवस्थापक प्रशासन

**आपले लक्ष्य, साध्य विसरु नका. अन्यथा जे काही मिळाले तेवढयावरच संतुष्ट राहण्याची सवय लागेल.**

## हिमाचल भटकंती



हाफकिन महामंडळाच्या कामगार कल्याण योजनेअंतर्गत व केंद्रिय श्रमिक शिक्षा मंडळाच्या निर्देशाप्रमाणे आम्ही हाफकिन महामंडळातील कर्मचा-यांनी जे प्रशिक्षण घेतलेले आहे. त्यामध्ये आर्थिक नियोजन, व्यवस्थापन, टिमवर्क, परराज्यात जाताना घ्यायची काळजी इत्यादी गोष्टी आम्ही शिकलो. त्या प्रशिक्षणाचा फायदा आम्हाला प्रतिवर्षाप्रमाणे आयोजित करण्यात आलेल्या ६व्या वार्षिक (फेब्रु.२०१८) सहलीला झालेला आहे. उत्तर भारतातील **सिमला, कुलू, मनाली, धर्मशाळा, डलहौसी, खज्जीयार (भारताचे मीनी स्विर्त्झलँड), चंबा, मथुरा, आग्रा, दिल्ली** इत्यादी रमणीय व नैसर्गिक सुंदरतेने संपन्न अशा प्रेक्षणीय स्थळांना व काही ऐतिहासीक ठिकाणांची भ्रमंती करण्यासाठी झाला. या सहलीमध्ये उत्तर भारतातील थंड हवेची ठिकाणे जसे की, सिमला, कुलू, मनाली, धर्मशाळा सारख्या ठिकाणी बर्फामध्ये आम्ही सर्वांनी केलेली मस्ती; तसेच दिल्ली येथील महाराष्ट्र सदनात दोन दिवस केलेला मुक्काम, आग्राचा ताजमहाल यांसारख्या गोष्टी नेहमी लक्षात राहतील. स्वस्तात व स्वयंखर्चाने फक्त प्रत्येकी रुपये १०,०००/- एवढया माफक खर्चात सहल आयोजित केलेली होती. या खर्चामध्ये दिल्ली ते मुंबई हा परतीचा प्रवास आम्ही विमानाने केला आहे. या सहलीमध्ये आम्ही हाफकिन महामंडळाचे ११ कर्मचारी सहभागी झालो होतो.- श्री. दिनेश नामदेव जगताप, श्री. विनय वसंत कदम, श्री. नितीन भानुदास भवर, श्री. बिरजू वसंत पवार, श्री. अरुणकुमार दुधाभाई परमार, श्री. राजू वाघमारे, श्री. दिनेश प्रेमजी सोसा, श्री. रमेश चंद्रू कांबळे, श्री. जितेंद्र महादेव केणी, श्री. रविंद्र गोपाळ धुमक, श्री. सुरेंद्र जाधव. या सहलींमधून भ्रमंती करुन आल्यानंतर आपल्या विभागांमध्ये रुजू होतांना कर्मचा-यांना एक वेगळया प्रकारची स्फुर्ती मिळते. मन प्रसन्न राहिल्यामुळे काम करताना प्रसन्नता जाणवते.

**श्री. नितिन भवर**
लिपिक टंकलेखक - कामगार कल्याण विभाग

## प्रचितगडाची भटकंती


श्री. अविनाश पिंगळे

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचे औचित्य साधून पिंपरी चिंचवड माउंटेनीअरिंग क्लब ने ''प्रचितगड'' ट्रॅक दिनांक ०४.०३.२०१८ रोजी आयोजित केला होता. आम्ही दिनांक ०३.०३.२०१८ रोजी या मार्गे निघालो. आम्ही सकाळी ६.२० वाजता १६ जणांनी ट्रैक चालू केला. साधारण ८.३० वाजता आम्ही गडाच्या पायथ्याजवळ पोहचलो. पुढे आम्हाला लोखंडी शिडयांवरुन जायचे होते. त्यातील २० फुटी दोन शिडया चढताना थोडी भिती वाटली कारण त्या फक्त मातीमध्ये उभ्या केलेल्या आहेत व त्यांना पकडण्यासाठी बाजूने काही नाही. एक तासानंतर आम्ही एका खिंडीमध्ये पोहचलो त्या ठिकाणी आम्हाला एक लोखंडी पूल दिसला, त्या पुलाची अवस्था अतिशय बिकट होती. त्याला खालून पाईपचे सपोर्ट असल्यामुळे आम्ही वरती गेलो. पुलावरुन सरळ गडाच्या दरवाज्यात पोहचलो. दरवाज्यामधून वर गेल्यावर डाव्या बाजूला पाण्याचे टाके आहे. परंतु त्यातील पाणी पिण्यायोग्य नाही. तेथून डाव्या बाजूला गेल्यावर आम्हाला छोटी गुहा दिसली त्या गुहेमध्ये पाहिले असता आतमध्ये पाणी होते. आम्ही या गुहेबाहेरुन साधारण २० फुट डाव्याबाजूने गेलो असता आम्हाला परत दुसरी गुहा दिसली. मागील गुहेसारखाच रस्ता आत जाण्यासाठी होता. यामधील पाणी अतिशय निर्मळ होते. म्हणजे खालील तळ आम्हाला स्पष्ट दिसत होता. आम्ही त्यातील पाणी पीण्यासाठी वापरले. पाणी इतके थंड होते की आमचा थकवा निधून गेला. अजून काही अंतर पुढे गेल्यावर तिसरी गुहा दिसली. त्यानंतर आमच्या लक्षात आले की, या तिनही गुहा आतमधून एकमेकांना जोडल्या आहेत. म्हणजे जर एका गुहेमध्ये जास्त पाणी झाले की दुस-या गुहेमध्ये ते जाते अशा प्रकारे या गडावर बाराही महिने पाणी राहते. अशा प्रकारे पाण्याचे नियोजन त्याकाळी छत्रपती शिवाजी महाराजांनी केले होते. या गडावर एक मोठे उंबराचे झाड दिसले त्याखाली बसून आम्ही थोडा आराम केला. गड ब-यापैकी स्वच्छ वाटला. या गडाची रचना पाहाता गडाद्वारे समुद्रमार्गे कोकणातून येणा-या शत्रूवर लक्ष ठेवण्यासाठी केला असावा असे वाटते. आमच्या जवळील पाण्याच्या बाटल्या गुहेमधील थंड पाण्याने आम्ही भरुन घेतल्या. सर्व सहा शिडया उतरुन आम्ही गडाखाली उतरलो. तेथे ओळखीचे म्हस्के कुटंबियांनी आम्हाला जेवण दिले जेवण करुन आम्ही परतीच्या प्रवासाला निघालो.

## हिमालयाची भटकंती




हाफकिन महामंडळाच्या पिंपरी विभागात कार्यरत असलेले कर्मचारी **श्री. कृष्णा ढोकळे** यांनी ४ ऑगस्ट २०१८ रोजी हिमाचल प्रदेशमधील लाहोल स्पीती व्हॅली येथील माउंट कॅथेड्रल हे ६००० मिटर उंचीचे शिखर सर करुन हाफकिन महामंडळाचा नामफलक आणि भारताचा तिरंगा ध्वज शिखरावर फडकवला.

कधी स्वत:लाच फोन लावून बघा लागणार नाही तो व्यस्त दाखवेल. जगात आपल्याकडे सगळयांसाठी वेळ आहे पण स्वत:साठी मात्र आपण व्यस्त असतो.

हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळातून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणारे अधिकारी आणि कर्मचारी यांचा त्यांच्या सेवानिवृत्तीच्या दिवशी महामंडळ निरोप समारंभ कार्यक्रम आयोजित करते. हाफकिन महामंडळातून सेवानिवृत्त होणा-या अधिकारी /कर्मचारी यांस शाल, श्रीफळ, डॉ. हाफकिनचे स्मृतीचिन्ह, अनुभव प्रमाणपत्र तसेच निवृत्त कर्मचारी यास त्यांच्या आवडीची एक भेटवस्तू आणि उपदान, रजा रोखीकरणाचा धनादेश देवून सत्कार केला जातो.

# आभार

## हाफकिन महामंडळातून दिनांक ०१ सप्टेंबर २०१७ नंतर सेवानिवृत्त झालेले अधिकारी व कर्मचारी



**श्री. चंद्रशेखर शिवकुमार होनराव**
उत्पादन सहा. वर्ग 'क'
यंत्र परिरक्षण विभाग
सेवानिवृत्ती दि. ३०.०९.२०१७

**श्री हरिशचंद्र कुशाबा कोल्हे**
पहारेकरी
प्रतिविष व रक्तजल विभाग पिंपरी, पुणे
सेवानिवृत्ती दि. ३०.११.२०१७





**श्री. बिपीन शि. गालीया**
उत्पादन सहाय्यक,
मौखिक पोलिओ विभाग
सेवानिवृत्ती दि. ३१.१२.२०१७

**श्री. बाजीराव शंकर पाटील**
उत्पादन सहा. वर्ग 'फ'
यंत्र परिरक्षण विभाग
सेवानिवृत्ती दि. ३१.०१.२०१८





**श्री. अरुण नरसिंह जोशी**
पहारेकरी
प्रतिविष व रक्तजल विभाग पिंपरी, पुणे
सेवानिवृत्ती दि. ३१.०१.२०१८

**श्री. शरद श्रीधर वंजारे**
लिपीक टंकलेखक
जावक विभाग
सेवानिवृत्ती दि. ३१.०५.२०१८






**श्रीमती पल्लवी परशुराम महाडीक**
उत्पादन सहा. वर्ग 'क'
मौखिक पोलिओ विभाग
सेवानिवृत्ती दि. ३१.०८.२०१८

चांगले कुटुंब आणि जिवाला जीव देणारे मित्र भेटणे म्हणजे दुसरे काही नसून जिवंतपणीच मिळालेले स्वर्ग आहे.

# आभार

हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळातून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणारे अधिकारी आणि कर्मचारी यांचा त्यांच्या सेवानिवृत्तीच्या दिवशी महामंडळ निरोप समारंभ कार्यक्रम आयोजित करते. हाफकिन महामंडळातून सेवानिवृत्त होणा-या अधिकारी /कर्मचारी यांस शाल, श्रीफळ, डॉ. हाफकिनचे स्मृतीचिन्ह, अनुभव प्रमाणपत्र तसेच निवृत्त कर्मचारी यास त्याच्या आवडीची एक भेटवस्तू आणि उपदान, रजा रोखीकरणाचा धनादेश देवून सत्कार केला जातो.



## हाफकिन अजिंठा फार्मा जळगांव विभागातून दिनांक ०१ सप्टेंबर २०१७ नंतर सेवानिवृत्त झालेले अधिकारी व कर्मचारी



**श्री. वसंत जी. खरे**
सुपरवायजर
सेवानिवृत्ती दि. ३०.०४.२०१७

**श्री. विलास पी. बामनोदकर**
प्रोसेस वर्कर
सेवानिवृत्ती दि. ३०.०४.२०१७





**श्री. धनराज एस. पाटील**
प्रोसेस वर्कर
सेवानिवृत्ती दि. ३१.०५.२०१७

**श्री. सतिश रामदास विसपुते**
वरिष्ठ मशिन ऑपरेटर
सेवानिवृत्ती दि. ३१.१०.२०१७



## आरोग्यासाठी योग

जळगाव शहर आपली जुनी ओळख सोनेरी शहर विसरून दवाखान्यांचे आणि औषधीचे शहर म्हणून नवीन ओळख बनविण्याकडे अतिशय वेगाने धावत आहे. जळगांव शहरात दवाखाने आणि औषधांची दुकाने अगदी भरभरुन कार्यरत आहेत. त्याला कारण तणावजन्य रोगांचा धुमाकुळ. अशा रोगांना आटोक्यात आणण्यासाठी घेण्यात येणा-या औषधांना मर्यादा पडत आहेत. खंगलेले शरीर व भंगलेले मन मनुष्याला साध उभेसुध्दा राहू देत नाही. अशी ही तणावजन्य रोगांची संख्या सध्या ९० टक्के चे आसपास आहे की, ज्याला औषधांची कुठल्याही प्रकारची गरज नाही. उरलेले जे १० टक्के आजार आहेत की ज्यांना औषधांची गरज आहे.

तणावजन्य लोकांची कारणे जर आपण बघितली तर गावांचे शहरीकरणाकडे झालेले रूपांतर यामुळे काही लाभही दिसतात परंतु त्याबरोबर काही समस्याही तयार झालेल्या आहेत. त्यात प्रदुषण, अन्न, वस्त्र व निवारा यांची हेळसांड, शिक्षण, बेकारी, गुन्हेगारी, घसरती नितिमत्ता, भयानक राजकारण व जीवघेणी स्पर्धा यामुळे जीवन कमालीचे तणावग्रस्त झाल्यामुळे उद्या उजाडणारा दिवस कसा आहे हे निश्चितपणे सांगता येत नाही. ताणतणाव, चिंता यांच्या त्रासामुळे शरीराचे व मनाचे कितीतरी रोग सध्या कितीतरी लोकांचे जीवन उध्वस्त करीत आहे. धावपळ करून केलेल्या कमाईचा ५० टक्के हिस्सा औषधोपचारात खर्ची होत आहे. यातुन सुटका करायची असेल तर त्यावर परिणामकारक उपाय काय हे थोडक्यात समजावून घेण्याच्या दृष्टिने योगाची कास धरणे केव्हाही उचित ठरते. कारण की योगिक साधना करण्यात कुठल्याही प्रकारचा खर्च न करता आरोग्य अधिक चांगल्याप्रकारे तणावग्रस्त स्थितीत सुध्दा सदृढ ठेवू शकते. योग ही आपल्या प्राचिन ऋषीमुनींनी तयार केलेली व अनुभवलेली प्राचिन आरोग्यविद्या आहे. आणि याचा वापर त्यांनी इ.स. पूर्व २००० ते ३००० वर्षापासूनच सुरु केलेला आहे. कालांतराने आधुनिक काळात हे शास्त्र ज्ञानदानाच्या अभावी लोप पडत गेले. मनुष्य आपली पारंपारिक परंपरा विसरला व पाश्चिमात्य तात्पुरत्या झटपट उपचार पध्दतीच्या मागे लागला. मनुष्य रोगाचे मुळ नष्ट कारण्याऐवजी रोगाच्या फांदया किती छाटल्या तरी मुळ कायम असल्यामुळे पुन्हा फांदया (रोग) येणारच आणि इथेच मोठा फरक आपणाला योगासंबंधी दिसतो. योग प्रथम रोग होवू देत नाही. झाला तर संपूर्ण मुळावरच प्रहार करून संपवतो.

**श्री. घनश्याम सुपे**
योग शिक्षक
आयुष मंत्रालय, भारत सरकारद्वारा मान्यताप्राप्त एम.ए. (योगशास्त्र)

**आपल्या मनाचे ओझं कमी करण्याचं ठिकाणं म्हणजे मैत्री.**

# अधिकारी आणि कर्मचारी यांच्या गुणवंत पाल्यांचे हार्दिक अभिनंदन

## कुमारी मानसी आनंद वाघ



हाफकिन महामंडळाच्या परळ येथे मौखिक द्रव्य विभागातील कर्मचारी श्री आनंद रामचंद्र वाघ यांची कन्या कुमारी मानसी आनंद वाघ ही शारदाश्रम विदयामंदीर, दादर येथे इयत्ता ८वी मध्ये शिकत आहे. मानसी हिने व्यंगचित्रे काढण्याचे खास प्रशिक्षण घेतले असून तिला मोठेपणी व्यंगचित्रकार व्हायचे आहे. अनेक ठिकाणी स्पर्धांमध्ये मानसीने काढलेल्या व्यंगचित्रांना पारितोषिके मिळालेली आहेत. डॉ. वाल्देमार मोर्दकाय हाफकिन यांचे मानसीने काढलेले व्यंगचित्र. कुमारी मानसी आनंद वाघ हिचे हार्दिक अभिनंदन व पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा!!



## कु. मिहिर संपतराव मोहिते



हाफकिन महामंडळाच्या गुणवत्ता आश्वासन विभागातील सहाय्यक व्यवस्थापक पदावर कार्यरत असलेल्या श्रीमती लीना मोहिते यांचा मुलगा कु. मिहिर संपतराव मोहिते, इयत्ता ८ वी, याची 'रिलायन्स फाउंडेशन यंग चॅम्प स्कॉलरशिप प्रोग्रामकरिता' निवड झाली आहे. या स्कॉलरशिप अंतर्गत कु. मिहिर याचा पुढील क्रीडा आणि शालेय शिक्षणाचा खर्च रिलायन्स फाउंडेशनमार्फत करण्यात येणार आहे. देशभरातील उत्कृष्ठ फुटबॉल खेळणा-या मुलांमधून कु. मिहिर मोहिते याची निवड झाली आहे. कु. मिहिर हा वयाच्या ८व्या वर्षापासून फूटबॉल खेळत आहे. कु. मिहिर याने कमी वयामध्ये मिळविलेले यश हे वाखाणण्याजोगे आहे. कु. मिहिर याचे हार्दिक अभिनंदन व पुढील क्रीडा क्षेत्रातील वाटचालीकरिता शुभेच्छा!!

## कु. ऋचा दिनेश पवार



हाफकिन महामंडळाच्या प्रतिविष व रक्तजल विभागाच्या अभियांत्रीकी विभागात कार्यरत असलेले श्री. दिनेश अविनाश पवार यांची मुलगी कु. ऋचा दिनेश पवार ही ज्ञानप्रबोधिनी नवनगर विद्यामंदीर येथे इयत्ता ४ थी मध्ये शिकत आहे. कु. ऋचा दिनेश पवार ही अखिल भारतीय गंधर्व महाविदयालय मंडल, मुंबई यांच्याकडून आयोजित वादय विषयात 'हार्मोनियम वाद्य परीक्षेमध्ये' शाळेमध्ये प्रथम श्रेणीमध्ये पास झाली आहे.

कु ऋचा हिला योग साधनेमध्येही खूप आवड आहे; तिने दिनांक २२.०४.२०१८ रोजी पिंपरी चिंचवड जिल्हा योग संस्था आणि क्रीडा भारती पिंपरी चिंचवड संस्थेमार्फत आयोजित ६ ते १० या वयोगटात (मुलींमध्ये) द्वितीय क्रमांक मिळविला आहे. तसेच तिने दिनांक १७.०६.२०१८ जिल्हास्तरीय ३७ व्या योगासन स्पर्धेमध्ये ८ ते ११ या वयोगटात (मुलींमध्ये) द्वितीय क्रमांक मिळविला आहे. कु. ऋचा हिला तिच्या संगीत आणि योग साधना या क्षेत्रामधील पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!!

## कु. चेलुवी कृष्णा ढोकळे



हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाच्या प्रतिविष व रक्तजल विभागात उत्पादन सहा. वर्ग 'ई' या पदावर कार्यरत असलेले श्री. कृष्णा सुखदेव ढोकळे, एव्हरेस्टवीर यांची कन्या कुमारी चेलुवी कृष्णा ढोकळे वय १३ हि अमृता विद्यालय, निगडी, पुणे येथे इयत्ता ६वी मध्ये शिकत आहे. कु. चेलुवी हिला लहानपणापासूनच स्पोर्ट क्लायंबिंग या साहसी खेळाची आवड आहे. कु. चेलुवी ही सन २०१५ पासून या खेळाचा सराव करीत आहे. तिची मागील तीन वर्षांपासून राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड होत आहे. तिने लहान वयातच या खेळामध्ये आपले प्राविण्य सिध्द केले आहे. स्पोर्ट क्लायंबिंग या खेळातील प्राविण्याच्या जोरावर चेलुवीने सन २०१६ मध्ये पश्चिम विभागामध्ये (महाराष्ट्र, मध्यप्रदेश, गुजरात, राजस्थान, छत्तीसगड, गोवा) Speed Climbing या खेळामध्ये रजत पदक पटकावले आहे. सन २०१७ मध्ये Bouldering या खेळामध्य खुल्या राष्ट्रीय स्पर्धेत कांस्यपदक मिळविलेले आहे. सन २०१८ मध्ये राष्ट्रीय स्पर्धेत Lead Climbing मध्ये कांस्यपदक पटकावले आहे. याबरोबरच चेलुवीने सन २०१८ मध्ये लोणावळयाजळील २५० फुट तैलबैल सुळक्यावर यशस्वी चढाई केलेली आहे. मावळ येथील १२० फुट उंच काळकराई सुळक्यावरही यशस्वी चढाई केलेली आहे.

हाफकिन महामंडळाकडून कुमारी चेलुवी हिला स्पोर्ट क्लायबिंग खेळासाठी खूप खूप शुभेच्छा व तिने लवकरच देशासाठी अशियाई व ऑलम्पिक स्पर्धांची पदके मिळवावीत या सदिच्छा!!

**जेंव्हा सगळचं संपूण गेलयं असं आपल्याला वाटतं, तीच खरी वेळ असते नवीन काहीतरी सुरु करण्याची.**

# बाळगोपाळांच्या राज्यात





















हाफकिन महामंडळाच्या कामगार कल्याणकारी उपक्रमांतर्गत महामंडळातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पाल्यांकरिता वसाहतीमध्ये हाफकिन बालवाडी व नर्सरी चालविण्यात येते. या नर्सरीमध्ये विविध सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रम आयोजित केले जातात. या उपक्रमांतर्गत शैक्षणिक सहल आयोजित करणे, नाताळ सण, ध्वजवंदन, महिला दिन, आषाढी एकादशी निमित्त विठ्ठल दिंडी यांसारखे अनेक उपक्रमांचा चित्रस्वरुपात घेतलेला मागोवा.

असामान्य माणसाची तीन लक्षणे असतात. तो चुकीचे काम करत नसल्याने त्याला चिंता नसते, त्याच्याकडे ठाम विचार असल्याने त्याच्या मनात गोंधळ नसतो, आणि तो शूर असल्याने त्याला कशाचीही भीती नसते.

# ध्वजवंदन













१५ ऑगस्ट २०१८ या स्वातंत्र्य दिनी हाफकिन जीव–औषध निर्माण महामंडळाच्या परळ विभागातील जेष्ठतम अधिकारी श्री. जगदिश. व्ही. कुलकर्णी,प्रभारी व्यवस्थापक प्रशासन यांच्या हस्ते परळ विभागामध्ये आणि पिंपरी विभागामध्ये डॉ.शिवाजी गाडे (प्रभारी व्यवस्थापक प्र.वि.र.वि) यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. आणि हाफकिन अजिंठा फार्मा. लि. जळगाव येथे श्री. किशोर गणपत चौधरी, वरीष्ठ मशीन चालक यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.



मुद्रण : संजय प्रिन्टर्स - ९८१९६१४४७५